https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -२९६ | रविवार,दि.२९ जुन २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-296 | Sunday, Dt.29 June 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# अध्यक्षांसह मुख्यमंत्री आणि खात्याच्या मंत्र्याचेही एमडी ऐकत नसल्याने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळावर दुर्दैवी वेळ ?

## समाजाच्या हितासाठी संभाजीनगर येथील विभागीय कार्यालय बीडमध्ये सुरू करण्यात शासन प्रशासन अपयशी !

### मराठा समाजासह सामान्य जनतेच्या मदतीतून बीडमध्ये महामंडळाचे विभागीय कार्यालय खाजगी जागेत सुरु होणार – अध्यक्ष नरेंद्र पाटील





बीड /प्रतिनिधी

बीडसह मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी जवळपास सर्वच जिल्ह्यामध्ये अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ अंतर्गत गरजवंत लाभार्थ्यापर्यंत खऱ्या अर्थाने पोहोचता आले नाही. कदाचित संभाजीनगर येथील विभागीय कार्यालय लांब पडत असेल. यामुळे समाजहित लक्षात ठेवून बीड जिल्हा मराठवाड्यासाठी सेंट्रल जिल्हा असल्यामुळे शासन आणि प्रशासनाकडे अनेक वेळा विनंती करून सुद्धा बीडमध्ये विभागीय कार्यालय शासकीय जागेत सुरू करण्यास परवानगी मिळाली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच या खात्याचे मंत्री अजितदादा पवार यांचे देखील महामंडळाचे एमडी ऐकत नाहीत, म्हणून ही दुर्दैवी वेळ आल्याची खंत महामंडळाचे दस्तूर खुद्द अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी बीडमध्ये पत्रकार परिषदेमधून व्यक्त केली.

बीड येथील जालना रोडवर पिंगळे यांच्या राजयोग कॉम्प्लेक्स येथे कै. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे खाजगी जागेत विभागीय कार्यालय लवकरच सुरू होणार आहे.या कार्यालयाचे डागडुजीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. यासंदर्भात महामंडळाचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी नवीन होणाऱ्या विभागीय कार्यालयाच्या हॉलमध्ये पत्रकार परिषद घेऊन महामंडळावर आलेले आर्थिक संकट आणि सरकार व प्रशासन यांची असलेली उदासीनता यासंदर्भात सत्तेतील प्रमुख घटक असताना देखील त्यांनी समाज हितासाठी सरकार आणि प्रशासनाच्या विरोधात वस्तुनिष्ठ वाभाडे जाहीर रित्या काढल्याने सरकारला घरातूनच चपराक देणारा आहेर मिळाला आहे. किमान आता तरी महाराष्ट्राच्या चाणाक्ष मुख्यमंत्र्यांनी आणि निवडणुकीत जातीचे भूत डोक्यावर घेऊन मिळवणारे या खात्याचे मंत्री महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी किमान समाज हितासाठी तरी विधायक आणि ठोस निर्णय घेऊन महामंडळाला न्याय देणे गरजेचे आहे.

## तिजोरीत खडखडाट की लाडकी बहीण योजनेचा फटका ?

महामंडळाला मंजूर झालेला निधी पैकी अत्यल्प निधीची रक्कम महामंडळाकडे वर्ग करण्यात आली आहे.कर्मचाऱ्यांच्या पगारी देखील होणे अवघड झाले आहे. मग महामंडळांतर्गत झपाट्याने विकासाची कामे कशी मार्गी लागतील. सरकार मंजूर केलेला निधी महामंडळाकडे देत नसल्यामुळे सरकारच्या तिजोरीत खडखडाट झाला आहे का ? लाडकी बहीण योजनेमुळे सरकार आर्थिक दृष्ट्या अस्थिर झाले आहे का ? यावर आता आत्मचिंतन करण्याची खरी गरज निर्माण झाली आहे.

## आमदार धस, खासदार सोनवणे यांनी दिले एक एक महिन्याचे भाडे तर कार्यकर्त्यांनी केली मदत ?

बीड येथे मराठवाड्यातील मराठा समाजाच्या प्रगतीसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे विभागीय कार्यालय सुरू करण्यासाठी प्रयत्न करत असताना देखील जिल्हाधिकारी परवानगी देत नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभाग जागा उपलब्ध नाही म्हणून सांगत आहे. सत्तेत असताना देखील मागील आठ महिन्यापासून कागदी घोडे फक्त नाचत असल्याने वैतागून मी बीड येथे माझ्या फाउंडेशन अंतर्गत शासनाचे विभागीय कार्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला. हे कळताच आष्टी विधानसभेचे आमदार सुरेश धस यांनी एक महिन्याचे ऑफिस भाडे ४० हजार रुपये तर बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी देखील एक महिन्याचे ऑफिस भाडे ४० हजार रुपये चेक द्वारे दिले आहेत. त्याच बरोबर महामंडळासाठी लागणारे विविध साहित्य खुर्ची, टेबल, फॅन, ट्यूबलाइट्स, फर्निचर अथवा रोख स्वरूपात मदतीचा ओघ आता कार्यकर्त्यांनी सुरू केला आहे. बीड जिल्ह्यातून मिळत असलेल्या या प्रतिसादाने मी अध्यक्ष म्हणून भारावून गेलो आहे, अशी प्रतिक्रिया अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी व्यक्त केली.

# विद्यार्थिनीचा लैंगिक छळ करणाऱ्या विजय पवार, प्रशांत खाटोकरला बीड पोलिसांनी ठोकल्या बेड्या

बीड : अकरावीच्या वर्गातील विद्यार्थिनीचा लैंगिक छळ करणाऱ्या विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोन्ही शिक्षकांना बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत. शनिवारी मध्यरात्री बारा वाजता ही कारवाई बीड तालुक्यातील मांजरसुभा परिसरात केली.



बीड शहरातील नामांकित उमाकरण शैक्षणिक संकुल येथे १७ वर्षाची मुलगी शिक्षण घेत होती . ३० जुलै २०२४ ते २५ मे २०२५ यादरम्यान विजय पवार व प्रशांत खाटोकर यांनी विद्यार्थीनीचा लैंगिक छळ केला होता. तिला नग्न करत आपल्या मोबाईल मध्ये फोटोही काढल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. याप्रकरणी २६ जून रोजी रात्री शिवाजीनगर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला.त्यानंतर हे दोन्ही आरोपी फरार झाले होते. त्यांच्या शोधासाठी स्थानिक गुन्हे शाखेसह तीन पथक रवाना झाली होती. अखेर या दोन्ही शिक्षकांना बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बांटेवाड व त्यांच्या पथकाने केली.

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुल क्लासमध्ये नेटचे शिक्षण शिकणार्या अल्पवयीन मुलीचा सातत्याने लैंगिक छळ करण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. पीडिता अल्पवयीन असल्याचे माहिती असूनही, तिच्याशी अश्लील वर्तन केल्याप्रकरणी उमाकिरणच्या दोन शिक्षकांविरोधात शिवाजीनगर पोलिस ठाण्यात पोस्को कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपी विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या नराधमा विरुद्ध गुन्हा दाखल झालेला असतानाही ते कोणाच्या वर हस्तामुळे फरार झाले होते.


प्राप्त माहितीनुसार त्या अल्पवयीन पीडित मुलीवर ३० जुलै २०२४ ते २५ मे २०२५ या कालावधीत लैंगिक शोषण घडल्याचे समोर आले आहे. आरोपी प्रशांत खाटोकर आणि विजय पवार हे दोघेही पीडितेला वारंवार क्लास

(उर्वरीत पान २ वर)

### इतर पिडितांनी सुध्दा समोर यावे ; आम्ही भाऊ म्हणून पाठीशी आहोत

उमाकिरण येथे मोठ्या प्रमाणात खासगी क्लासेस चालतात. या ठिकाणी बीडसह बाहेरील जिल्ह्यातून विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येतात. मात्र उमाकिरण संकुलातील एका क्लासेसमधील दोन शिक्षकांनी विद्यार्थिनीशी गैरवर्तन केल्या प्रकरणी काल बीडमध्ये पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. शिक्षक आणि विद्यार्थिनीच्या नात्याला काळीमा लावणार्या प्रकाराने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी स्वाभिमानी संघटनेच्या वतीने आज उमाकिरण शैक्षणिक संकुल येथे जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रा.सचिन उबाळे म्हणाले की, पीडिताने समोर येऊन सर्व माहिती द्यावी, तुमचा भाऊ म्हणून मी कायम पाठिशी आहे.



## अहो... मोठ्ठ्या ताई काय चाललयं, तुमच्या जिल्ह्यात ?

बीड ।प्रतिनिधी

बीडमध्ये शिक्षणाच्या नावावर चाललेले पाप आणि हे पाप करणार्यांना पाठीशी घालणारे हरामखोर आरोपींचे राजकिय बाप कोण आहेत ? असा सवाल करत भाजपा आ.चित्राताई वाघ यांनी खा.सुप्रिया सुळे यांना प्रश्न विचारला आहे. बीडमध्ये विजय पवार, प्रशांत खाटोकर यांनी विद्यार्थीनींचा लैंगिक छळ केला, सोलापुरमध्ये माजी महापौर मनोहर सपाटे महिलेचा विनयभंग करतो. तरी मोठ्ठ्या ताई चकार शब्द काढत नाहीत असे आ.चित्राताई वाघ यांनी म्हटले आहे.


## नराधमाला नागडं करून, ओल्या बाबूने भर चौकात झोडपा

बीड येथील नामांकित उमाकिरण संकुल येथे प्रोफेशल अकादमी मधील विध्यार्थीनी बाबत झालेला प्रकार अतिशय निदानीय आहे आज शिक्षक हा राष्ट्र निर्मितीचा महत्वाचा कण मानला जातो परंतु शिक्षकच व्यभिचारी दुराचारी असेल तर मुलानी आदर्श कोणाचा घ्यायचा ?, उमाकिरण संकुल मधील प्रोफेशल कोचिंग क्लास मधील प्रशांत खाटोकर, प्रा विजय पवार या नराधमांनी केलेला प्रकार शिक्षकी पेशाला कलमा फासणारा असून शिक्षकी पेशाला काळिमा फासणार्या नराधमाला सोडू नका त्याच्यावर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी असे आवाहन राजेंद्र आमटे, सूरज चुगडे यांच्या वतीने करण्यात येत आहे.आज भारत विश्व गुरू म्हणून ओळखला जात असताना गुरू शिष्य परंपरेचा खूप मोठी उज्ज्वल परंपरा असताना शिक्षकी पेशाला काळिमा फासणार्या बीड येथील नराधमाला सोडू नका. अनेक पालक लाखो रुपये भरून आपल्या मुला मुलींचं भविष्य घडवतील म्हणून कोचिंग क्लास मध्ये मुलांना पाठवतात व मुलांना शिकवणे त्यांना संस्कारीत करण्या ऐवजी हे दळभद्री नराधम असले चाळे करतात यात पोलिसाने नराधमाला भर नागडं करून ओल्या बाबूने झोडपावे व आरोपीना कसल्याही पळवाटा काढू देऊ नका त्या नराधमावर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा राजेंद्र आमटे, सूरज चुगडे यांच्या वतीने देण्यात येत आहे

## शहरातील सर्व पालकांची पोलीस ग्राऊंडवर बैठक घेणार– राहुल दुबाले

उमाकिरण मध्ये प्रा.पवार आणि प्रा.खाटोकर या नराधमांनी जे निच कृत्य केले आहे त्याचा निषेध करत पोलीस बॉईज संघटनेचे प्रमुख राहुल दुबाले यांनी शहरातीलच सर्वच शाळा, कॉलेज, खाजगी क्लासेस या ठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून भेडसावत असणार्या मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न मांडला आहे. यासाठी शहरातील सर्व पालकांची एक बैठक पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर घेणार असल्याचे त्यांनी जाहिर केले आहे.

## बीड पोस्टल पतसंस्थेच्या बातमी बाबत खुलासा


-:: आदेश::-

१. अर्जदार क्र.०१ व ०२ यांचे मर्यादेपर्यंतचाच जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,बीड यांनी दिनांक १७/०६/२०२५ रोजी च्या आदेशास स्थगिती मिळणेबाबतचा दिनांक २५/०६/२०२५ रोजीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२.सदरचे दाखल अपिल क्र.३५/२०२५ अन्वये नोंदविण्यात येत आहे.
३.अर्जावर पुढील सुनावणी दिनांक १०/०७/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता निर्धारीत करण्यात येत आहे.
४. खर्चाबाबत आदेश नाही.

सदर आदेश आज दिनांक २६/०६/२०२५ रोजी माझे सहीने व कार्यालयाचे मुद्रेसह पारित केला आहे.

( सुनिल शिरापुरकर )
विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था, लातूर विभाग,लातूर

जा.क्र./अपील/ 1476 /स्थगिती अर्ज क्र.१०/२५/सन-२०२५
कार्यालय, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर
दिनांक:-26 /०६/२०२५
प्रत,१.संबंधीतास नावाने,२.स्थायी आदेश संचिका.

बीड ।प्रतिनिधी

डी डी आर यांच्या १७ जून २०२५ च्या आदेशाच्या विरोधात लातूर येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचा आदेश रद्द केला आहे.यामुळे बीड पतसंस्थेतील विरोधी गटातील सदस्यांनी वैयक्तिक आकसापोटी अध्यक्ष आणि सचिव यांच्या निलंबनाची चुकीची जुनी बातमी जाणीव पूर्वक बदनामी करण्याच्या उद्देशाने दिली असल्याचे वीर आणि ढाका यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.सदरील ५ वर्ष निलंबनाचा आदेश लातूर येथील वरिष्ठ अधिकाऱ्याने २६ जून २०२५ रोजी रद्द केलेला आहे, असे बीड पोस्टल पत संस्थेचे चेयरमन विष्णू किसनराव वीर आणि सचिव अमरसिंह ढाका यांनी आदेशाची प्रत दाखल करत खुलासा केला आहे.



## संपादकीय

# 'एससीओ'चा दुटप्पीपणा

भारताची कोंडी करण्याचे यजमान चीन आणि पाकिस्तान यांचे राजकारण यामागे आहे. हे राजकारण आणि 'एससीओ'च्या बैठकीची दहशतवादाबाबतची सोयीस्कर भूमिका निषेधार्ह आहे.पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख नसल्याने शांघाय सहकार्य परिषदेत (एससीओ) सहभागी देशांच्या संरक्षणमंत्र्यांच्या बैठकीतील संयुक्त निवेदनावर स्वाक्षरी न करण्याची भारताची कृती आजवरच्या भूमिकेशी सुसंगत अशीच आहे. प्रादेशिक शांततेला दहशतवादामुळे निर्माण झालेल्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठीच्या या संयुक्त निवेदनात पाकिस्तानमधील जाफर एक्स्प्रेसवरील हल्ल्याचा उल्लेख असणे आणि पाकिस्तानने घडवून आणलेल्या पहलगाम हल्ल्याचा समावेश नसणे यातून 'एससीओ'चा दुटप्पीपणा दिसतो.

भारताची कोंडी करण्याचे यजमान चीन आणि पाकिस्तान यांचे राजकारण यामागे आहे. हे राजकारण आणि 'एससीओ'च्या बैठकीची दहशतवादाबाबतची सोयीस्कर भूमिका निषेधार्ह आहे. दहशतवादाकडे सोयीने आणि हितसंबंधांच्या दृष्टिकोनातून पाहण्यामुळेच त्याचे आव्हान वाढले आहे. चीनच्या छिंगदाव येथे झालेली ही बैठक या आव्हानाला सामोरे जाण्यात अपयशी ठरली आहे. इस्रायल-इराण युद्धाच्या आणि त्याच्या आधी भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या या बैठकीत प्रादेशिक सहकार्याबरोबरच शांततेचा आणि दहशतवादाचा मुद्दा येणे स्वाभाविक होते. गेल्या तीन दशकांपासून पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचा सामना करीत असलेला भारत सर्व आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर हा मुद्दा जोरकसपणे मांडत आहे.

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख करून संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी पाकिस्तानच्या कारवायांचा पाढा या बैठकीत वाचला. दहशतवादाचा शस्त्रास्त्रासारखा वापर करण्याची प्रवृत्ती असणारे देश असतील, तर शांतता कशी प्रस्थापित होईल, असा सवाल त्यांनी केला. अशा अविश्वासाच्या वातावरण शांतता नांदण्यासाठी दहशतवादाचा बीमोड करण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. त्यांनी अशा प्रकारे पृष्ठभूमी करूनही संयुक्त निवेदनात पहलगाम हल्ल्याचा उल्लेख केला गेला नाही. याच्या उलट बलुचिस्तानातील दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख केला गेला. अशा निवेदनावर स्वाक्षरी न करण्याचा पवित्रा घेऊन संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी योग्यच केले.

भारताच्या नकारामुळे सर्वसहमतीने निवेदन प्रसिद्ध करण्यात ही बैठक अयशस्वी ठरली हे खरे; परंतु दहा देशांचा समावेश असलेल्या या परिषदेत भारताच्या बाजूने एकही देश उभा राहिला नाही, ही चिंतेची बाब म्हणावी लागेल. चीन आणि पाकिस्तान यांच्याखेरीज कझाकस्तान, किरगिझिस्तान, उझबेकिस्तान, ताजिकिस्तान हे मध्य आशियाई देश, तसेच रशिया, बेलारूस आणि इराण हे 'एससीओ'चे सदस्य देश आहेत. रशिया हा भारताचा जुना मित्र खरा; परंतु त्यानेही या बैठकीत भारताची बाजू घेतली नाही. रशिया-युक्रेन युद्ध , इस्रायल-हमास आणि इस्रायल-इराण संघर्ष या पार्श्वभूमीवर नवीन आंतरराष्ट्रीय समीकरणे सध्या साकारली जात आहेत. त्याचा हा परिणाम असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# आज निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब आणि गृह उपविभागीय पोलीस अधिकारी उमाकांत कस्तुरे साहेब यांच्या शुभहस्ते

## वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा आज २९ जून रोजी रविवारी होणार गुणगौरव सोहळा – विकास स्वामी, वैभव स्वामी

### प्रथम, द्वितीय, तृतीय विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक

इयत्ता १० वी आणि इयत्ता १२ वी परीक्षेमध्ये वीरशैव लिंगायत समाजातील ज्या विद्यार्थ्यांनी सत्कार स्वीकारण्यासाठी जगद्विवेक प्रतिष्ठान कडे नोंदणी केली आहे. अशा विद्यार्थ्यांमधून जे विद्यार्थी दहावी आणि बारावी दोन्ही वर्गातून स्वतंत्ररित्या प्रथम येतील त्यांना १००१ रुपये रोख बक्षीस तर द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख ७०० रुपये बक्षीस तसेच तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख ५०० रुपये बक्षीस देण्यात येणार असून उत्तेजनार्थ निवडलेल्या विद्यार्थ्यास ३०० रुपये रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

बीड /प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांनी ६० टक्के पेक्षा अधिक गुण घेतले आहेत. अशा विद्यार्थ्यांचा निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब आणि पोलिस गृह उपविभागीय पोलीस अधिकारी उमाकांत कस्तुरे यांच्या सह मान्यवरांच्या शुभहस्ते यथोचित गुणगौरव सत्कार करण्यात येणार

आहे. सत्कारास पात्र असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांनी जगद्विवेक प्रतिष्ठानकडे तात्काळ संपर्क साधावा असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास स्वामी आणि सचिव वैभव स्वामी यांनी केले आहे.

जगद्विवेक प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्ष आदर्श मुख्याध्यापिका शिवैक्य जगदेवी विवेक स्वामी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून प्रतिवर्षी वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते २५ जून रोजी सन्मानपत्र, पेन, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात येते. यावर्षी हाच सोहळा रविवार दिनांक २९ जून २०२५ रोजी बीड येथील स.मा. गर्गे भवन, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या जवळ, तुळजाई चौक,बीड येथे सकाळी ११ वाजता निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब, गृह उपविभागीय पोलीस अधिकारी उमाकांत कस्तुरे सर यांच्यासह लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान, सत्कार ,गुणगौरव करण्यात येणार आहे. या सत्कारास पात्र असलेल्या वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांनी आपला मार्क्स मेमो, संपूर्ण नाव, संपूर्ण पत्ता तालुका जिल्हा पिन कोड सह, तसेच पासपोर्ट फोटो २७ जून पर्यंत व्हाट्सअप नंबर ९४ २२ ७४ ४६ ०५ किंवा ९९ ६० ४६ ३२ ४४ या नंबर वर पाठवून नोंदणी करावी असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने अध्यक्ष विकास स्वामी, सचिव वैभव स्वामी, उपाध्यक्ष सौ वैशाली स्वामी, सहसचिव सौ रुपाली स्वामी, कार्याध्यक्ष सौ वनमाला स्वामी, समन्वयक सौ वर्षा स्वामी, सदस्य शशांक स्वामी, वेदांत स्वामी तसेच प्रतिष्ठानचे विश्वस्त विलास स्वामी, अशोक स्वामी, दिलीप स्वामी, प्रशांत स्वामी, सतीश स्वामी, नागेश स्वामी, राजेश स्वामी आदींनी केले आहे.

# खासदार डॉ.कल्याण काळे यांनी घेतली खत टंचाई आढावा बैठक



जालना ।प्रतिनिधी

दिनांक २७.०६.२०२५ शुक्रवारी जिल्ह्यात खत टंचाई बाबत जिल्हाधिकारी कार्यालयात, जालना येथे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी बैठक घेऊन ऐन खरीपाच्या पेरणीच्या तोंडावर खत टंचाई बाबत आढावा घेतला.ही कृत्रिम खत टंचाई आहे का , खत कंपन्या जाणीवपूर्वक पुरवठा करत नाहीत. शेतकरी चढ्या दराने खत खरेदी करतो २०० लाख मे टन खताचं उद्दीष्ट आहे. जुन महिन्यात ८७००० हजार मे टन वितरणात आलेल आहे युरीया खताचा तुटवडा जाणीवपूर्वक केला जातो खता सोबत इतर उपवस्तु जबरदस्तीने दिल्या जातात त्यासाठी युरीयाची अट घातली जाते तसेच डीएपी खताची सुद्धा मोठ्या प्रमाणात टंचाई जिल्ह्यात जाणवत आहे. शेतकऱ्यांच्या माथी जबरदस्तीने नको असलेले खते व औषधे मारली जातात. याबाबत सविस्तर आढावा घेऊन अधिकारी व खत कंपन्यांच्या प्रतिनिधींना सूचना केल्या. नवीन श-ीं मशिन उपलब्ध करून देण्या बाबत सुचना केल्या जिल्ह्यात १०८५ अधीकृत परवाना धारक आहेत खत कंपन्यांना व जिल्हा कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबत सुसुत्रता येण्याबाबत सक्तीच्या सुचना केल्या. जालना जिल्ह्याची खताची मागणी एप्रिल २०२५ ते जुन २०२५ पर्यंत पुढील प्रमाणे आहे. युरिया मागणी २९५३४ मेट्रिक टन, पुरवठा २२४१८ मेट्रिक टन एकूण ७११६ मेट्रिक टन युरिया पुरवठा कमी आहे. तसेच डीएपी मागणी १३८८३ मेट्रिक टन, पुरवठा ८१७७ मेट्रिक टन एकूण ५७०६ मेट्रिक टन डीएपी पुरवठा कमी आहे. एमओपी मागणी १२३९ मेट्रिक टन, पुरवठा ५९३ मेट्रिक टन एकूण ६४६ मेट्रिक टन पुरवठा कमी तसेच एसएसपी मागणी १६०१६ मेट्रिक टन, पुरवठा १२५३३ मेट्रिक टन एकूण ३४८३ मेट्रिक टन पुरवठा कमी. खत कंपन्यांनी फक्त एनपीके चा पुरवठा मागणीपेक्षा जास्त केलेला आहे. या गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांना वेळेवर व मुबलक खत उपलब्ध होण्याबाबत सर्व संबंधित यंत्रणांना सजग होऊन योग्य नियोजन करून शेतकऱ्यांच्या प्रति असलेले दायित्व पूर्ण क्षमतेने निभावण्याचे निर्देश देण्यात आले.या वेळी फर्टीलायजर ब्लॉक या मोबाईल अँप चे उद्घाटन खा.डॉ.कल्याण काळे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले या अँप मुळे शेतकऱ्यांना कोणत्या दुकानात किती व कोणते खत उपलब आहे याची माहिती, खत विक्रेत्याचा मोबाईल नंबर उपलब्ध होणार आहे तसेच जिल्ह्यातील खताबाबत सर्व माहिती या अँप मुळे पारदर्शक होईल अशी आशा खा.डॉ.कल्याण काळे यांनी व्यक्त केली. या वेळी अप्पर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार, जिल्हा कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, जिल्हा परिषदेचे प्र.कृषी अधिकारी पी.बी.बनसावडे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, जि.प.जालना मा.कृषी सभापती रामधन कळंबे, जि.प. जालना चे मा. सभापती भानुदासराव घुगे नाना,जालना पं.स. चे माजी उपसभापती सोपानराव तिरुखे, श्री राम सिरसाठ, सुभाष मगरे, देवजीनाना जऱ्हाड, ज्ञानेश्वर शिंदे, विजय जऱ्हाड, अजय बनकर शेतकरी संघटनेचे सुरेशराव काळे, दत्तात्रय कदम, नारायणराव वाढेकर, अरुण पैठणे संबंधित सर्व विभागाचे अधिकारी, खत कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



# लैंगिक छळ प्रकरणातील आरोपी विजय पवारला आ. संदीप क्षीरसागर यांचे पाठबळ – डॉ.योगेश क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थिनीच्या लैंगिक छळ प्रकरणातील आरोपी शिक्षक विजय पवारला आमदार संदीप क्षीरसागर यांचे राजकीय पाठबळ असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केला आहे.

विजय पवार हा आमदार संदीप क्षीरसागरांचा राईट हॅन्ड असून, घटनेनंतर रात्री आमदारांच्या घरी जाऊन संबंधित यंत्रणांना फोन केले गेले. इतक्या गंभीर गुन्ह्यात आरोपी फरार राहतो, यामागे कोणाचा दबाव आहे का, याचा तपास झाला पाहिजे. शिक्षण क्षेत्रात पवार यांचा दबदबा असून, याआड अनेक आर्थिक गैरव्यवहार झाले असल्याचा आरोपही डॉ.क्षीरसागर यांनी केला. या प्रकरणाची सखोल चौकशी करून पीडितेला न्याय द्यावा. तसेच, सोमवारी बीड जिल्हा बंद पुकारण्यात आला असून सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

शिक्षण क्षेत्रात पवारचा दबदबा असून, याआड आर्थिक गैरव्यवहार, जमीन घोटाळे व क्लासेस चालक व विद्यार्थ्यांना त्रास देण्याचे प्रकार घडले आहेत. या घटनेमुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, बीडमध्ये शनिवारी शैक्षणिक बंद पाळण्यात आला. सोमवारी जाहीर करण्यात आलेल्या जिल्हा बंदमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ.क्षीरसागर यांनी केले. पीडित मुलगी मानसिकदृष्ट्या खचली असून, तिच्या कुटुंबीयांनी पुढे येऊन आवाज उठवावा, तसेच हा लढा सर्वांचा व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करून पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी स्वतः पुढाकार घेणार असल्याचे डॉ. योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षकांकडून तसेच पीडितेच्या कुटुंबियांकडून माहिती घेतली असून, संपूर्ण प्रकरण पालकमंत्र्यांसमोर मांडले जाणार आहे. पवारचे सीडीआर तपासणे, सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेणे आणि आरोपीवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे डॉ.क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. राजकारण बाजूला ठेवून आरोपीला वाचवण्याचा कोणताही प्रयत्न होऊ नये, यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

पान १ वरून...

### विद्यार्थीनीचा लैगिंक...

संपल्यानंतर केबिनमध्ये बोलवत असत. यावेळी ते पीडितेचा जबरदस्तीने तिच्याशी अश्लिल वर्तन करणे, मोबाईलमध्ये अश्लिल फोटो काढायचे असे फिर्यादीत म्हटलेले आहे. या प्रकारामुळे पीडितेवर मानसिक आघात झाला असून, तिने घडलेली संपूर्ण घटना आपल्या पालकांना सांगितल्यानंतर त्यांनी थेट पोलिस ठाण्यात धाव घेतली. त्यानुसार शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपींविरुद्ध पोस्को कायदा आणि भारतीय दंडविधानातील संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच दोन्हीही आरोपी फरार असून पोलीसांकडून त्यांचा शोध सुरु आहे.

शैक्षणिक बंदला उस्फूर्त पाठिंबा

बीड शहरातील शिक्षण प्रेमी नागरिकांनी एकत्र येवून या अमानवीय घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला आहे. विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोघांच्या वर्तनुकी विषयी आता अनेकजण बोलू लागले असून ज्या मुलीने आणि पालकांनी या दोन नालायका विरुध्द गुन्हा दाखल करण्याचे धाडस दाखवले त्यांच्या धाडसाचे कौतुक होत आहे. अनेकजण पवार आणि खाटोकरच्या पैशाच्या मस्तीमुळे आणि राजकिय दहशतीमुळे बोलायची हिम्मत करत नव्हते. आता सर्वचजण प्रतिकार करण्यासाठी पुढे आले असून बीड मध्ये शैक्षणिक बंदला उत्स्फूर्त पाठिंबा देण्यात आला आहे.

# समिधा फाऊंडेशन व सरहद संस्थेचा उपक्रम

## दिंद्रुडच्या विद्यार्थ्यांना 'पुस्तक हेच शस्त्र' उपक्रमा अंतर्गत पुस्तक भेट

दिंद्रुड ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात वाचन संस्कृती रुजवण्याचा हेतूने समिधा फाउंडेशन व सरहद पुणे या संस्थांच्या वतीने दिंद्रुड च्या विद्यार्थ्यांना पुस्तक हेच शस्त्र उपक्रमांतर्गत पुस्तक भेट देण्याचा कार्यक्रम शनिवारी पार पडला. दीडशे पुस्तकांचा वाटप याप्रसंगी करण्यात आले.

मुलांच्या मनामध्ये चांगले विचार यावेत, जिज्ञासा आणि आत्मभान निर्माण व्हावे, गुन्हेगारी प्रवृत्ती नाहिशी होण्यासाठी कायद्याचे ज्ञान मिळावे या उद्देशाने पुणे येथील समिधा फाउंडेशन व सरहद पुणे या संस्थेच्या वतीने राज्यभरात विविध प्रकारच्या पुस्तकांचे वाटप करण्यात येते याच अनुसंगाने माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील स्व. सोनाजीराव रांजवन माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. संस्थेचे समन्वयक देवराज युवराज ठोंबरे यांनी या उपक्रमाच्या आयोजन केले होते. यावेळी उपस्थित माजी उपसरपंच युवराज ठोंबरे, ग्रा पं सदस्य अतुल चव्हाण, शाळेचे मुख्याध्यापक जि व्ही उजगरे सर, भोसले सर,माऊली कटारे, बारवकर सर,आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सपाटे, पत्रकार गणेश काटकर, शाळेचे शिक्षक वृंद उपस्थित होते.



गेल्या काही काळात बीड जिल्ह्यात वाढत चाललेली गुन्हेगारी आणि तरुणांमध्ये वाढणारी हिंसक प्रवृत्ती लक्षात घेता 'पुस्तक हेच शस्त्र' या विचाराने प्रेरित होऊन हा उपक्रम हाती घेण्यात आला. वाचनाने निर्माण झालेला विचारांचा प्रभाव यशस्वी जीवनासाठी अमुलाग्रह बदल करतो. म्हणून आम्ही पुस्तक वाटपाचा उपक्रम राबवत आहोत.

–देवराज ठोंबरे,समन्वयक समिधा

# कै. दत्ताजी भाले संकुलामध्ये भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा ७४ वा संस्था वर्धापनदिन आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार संपन्न

अंबड ।प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या ७४ वा संस्था वर्धापन दिन व गुणवंत विद्यार्थी सोहळा अतिशय उत्साही वातावरणात संपन्न झाला. या दिनानिमित्त व्यासपीठावर उपस्थित आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री केदारजी मंत्री (कार्यवाह स्था. व्य. स.), मा. श्री. आदिनाथजी ढाकणे (पोलीस उपनिरीक्षक अंबड), मा. श्री. विजयजी चाटूफळे ( केंद्रीय कार्य. सदस्य) मा. श्री व्यंकटेशजी गोसावी (स्था. व्य. स. अध्यक्ष) मा. श्री. रमेश सिंह बुंदेलखंडे, वैभव घुगे (माजी विद्यार्थी ), पार्थ सोमानी(माजी विद्यार्थी) विजय लांडे(माजी विद्यार्थी) सौरभ वराडे(माजी विद्यार्थी) अमित अंबिलवादे(माजी विद्यार्थी) मा.श्री. सुधाकरजी घायतडक (माध्य. विभाग मुख्याध्यापक) श्रीम. सुषमाताई मोरगावकर ( मुख्या .प्राथ. विद्यालय) उपस्थित होते.

या कार्यक्रम प्रसंगी सर्वप्रथम भारतमाता, व दत्ताजी भाले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मा. श्री. विजय चाटूफळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत व राज्य गीत हे सांघिक स्वरूपात घेण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मा. श्रीम. सुषमाताई मोरगावकर यांनी केले.त्यामध्ये त्यांनी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा इतिहास आणि कै. दत्ताजी भाले विद्यालय याचा इतिहास याविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. त्यानंतर संस्था प्रार्थना हे प्रभो आनंददाता ही सांघिक प्रार्थना श्रीमती अनुराधा भाकरे मॅडम यांनी घेतली.त्यानंतर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे माहितीपत्रक ध्येयपथ याचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.इयत्ता पहिली ते सातवीतील आदर्श विद्यार्थी, खचज परीक्षेमधील गोल्ड मेडल विद्यार्थी, मंथन परीक्षा आणि पावसाळी क्रीडा स्पर्धेमधील गुणवंत विद्यार्थी आणि इयत्ता दहावी गुणवंत विद्यार्थी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. खचज परीक्षेमध्ये उत्कृष्ट प्रतिसाद दिल्यामुळे शिक्षकांना आणि कै. दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका यांना बेस्ट प्रिन्सिपल हा अवॉर्ड देण्यात




आला. त्यानंतर स्व. द्वारकादासजी मंत्री काका यांचे स्वतःच्या वाचनालय पुस्तके ग्रंथालयास भेट म्हणून देण्यात आली.मा. श्री विजयजी चाटूफळे सरांनी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा इतिहास आणि आज संस्थेचे असणारे भव्य रूप या विषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. मा. श्री आदिनाथ ढाकणे सर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेमध्ये अभ्यास कसा करावा त्याचे मोलाचे मार्गदर्शन केले आणि संस्था वर्धापन दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोपात मा.श्री केदारजी मंत्री येणाऱ्या काळामध्ये भौतिक सुविधांसाठी आभाव कमी करून शाळा सुंदर कशी बनवणे याबद्दल प्रयत्नशील राहू असे सांगितलं. आणि संस्था वर्धापन दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीम. प्रतिभा आजबे व ऋणनिर्देश श्री. घायतडक सर यांनी केले. कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रम प्रसंगी सर्व पदाधिकारी, शिक्षकवृंद, सर्व विद्यार्थी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## आज हिंदी भाषेच्या सक्ती विरोधात आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने उपस्थित रहा – जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

बीड ।प्रतिनिधी

आज ठाकरे शिवसेनेच्या वतीने पेठ बीड येथील महामानव राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर शासनाच्या जी.आर.ची भव्य होळी करण्यात येणार आहे. या अन्यायाविरुद्ध व हा निर्णय रद्द होण्यासाठी जिल्ह्यातील सर्व पक्षांचे लोकप्रतिनिधी,कलावंत ,शिक्षक , डॉक्टर, इंजिनिअर, वकील, सर्व स्तरातील मान्यवर व शिवसेनेचे पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना, किसान सेना व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांनी केले आहे.



पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायक राऊत, संपर्कनेते सुनिल प्रभू साहेब, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब, संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या नेतृत्त्वाखाली महाराष्ट्र शासनाने इयत्ता १ ली पासून हिंदी भाषा हि सक्तीची केली आहे. एवढ्या लहान वयात मुलांना हे खुप मोठे ओझे होत आहे. तसेच पर्यायाने मराठी भाषेचे प्रभुत्व कमी होणार आहे. महायुतीच्या शासनाचा हा डाव हाणून पाडण्यासाठी आज रविवार दि. २९/६/२०२५ रोजी दुपारी ठिक ३ वाजता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे बीड जिल्हा पक्षाच्या वतीने करण्यात येणाऱ्या आंदोलनामध्ये उत्स्फूर्तपणे सर्वांनी सहभागी होऊन सरकारच्या या आत्मघातकी निर्णयाविरुद्ध रोष व्यक्त करावा असे आवाहन शिवसेना बीड जिल्हा प्रमुख गणेश वरेकर यांनी केले आहे.

# अंतरवाली येथे बैठकीसाठी जाणाऱ्या मराठा बांधवासाठी आनंद काळे यांच्या वतीने खिचडी वाटपाचे आयोजन

## जातीपातीच्या पलीकडे समाजकार्य करणारा युवक - आनंद काळे

जरांगे पाटलाच्या प्रत्येकआंदोलनासाठी खिचडी, पाणी , गाड्याची केली होती व्यवस्था

वडवणी ।प्रतिनिधी

अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाच्या आरक्षणसाठी संघर्ष योद्धा मनोज सारंगे पाटील यांनी निर्णय बैठकीचे आयोजन दि.२९/६/२०२५ रोजी रविवारी या दिवशी आंतरवाली सराटी होते आयोजन करण्यात आले आहे या बैठकीला जाण्यासाठी केव्हा गावातून मराठा बांधव जाणार आहे त्यांच्या सकाळी नाश्त्याची व पाण्याची व्यवस्था ओबीसी समाजाचे युवा नेते मराठा समाजाच्या प्रत्येक आंदोलनात समाज कार्य करणारे आनंद भैय्या काळे व मित्र मंडळ च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक वडवणी येथे खिचडी व पाणी वाटपाचे आयोजन करण्यात आले होते तरी महा बैठकीसाठी जाणाऱ्या सर्व मराठा बांधवाने नाश्ता करूनच पुढे जावे असे आवाहन आनंद भैय्या काळे यांनी केले आहे.



मराठा समाजाला सरसकट ओबीसीतील आरक्षण मिळावे यासाठी गेल्या दोन वर्षापासून संघर्ष होता म्हणून तरंगे पाटील हे वेळोवेळी आंदोलन करत आहेत मात्र शासनाने त्याची दखल न घेतल्यामुळे २९ ऑगस्टला मुंबई आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे त्यामुळे मोर्चाचे नियोजन करण्यासाठी दिनांक २९ जून रोजी अंतरवाली सराटी येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे या बैठकीसाठी संबंध वडवणी तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर मराठा युवक जाणार आहे त्यांना सकाळी ८ ते १२ या वेळेत खिचडीचा नाश्ता व पाणी वाटप चे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आनंद भैय्या काळे व मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे तरी या मार्गाने येणाऱ्या सर्व मराठा बांधवांनी नाश्ता करूनच जावे असे आभार मराठा समाज बांधवांना केली आहे

मराठा समाजाच्या प्रत्येक आंदोलनात सिंहाचा वाटा उचलणारे ओबीसी चे नेते आनंद काळे यांनी या अगोदरही खिचडी वाटप पाणी वाटप गाड्यांची व्यवस्था यासह अनेक समाज कार्य केले आहे त्याचाच भाग म्हणून या आंदोलनातही ते मागे राहिले नाही त्यांनी या अगोदरही आंतरवाली सराटी येथे जाऊन जरंगे पाटलाच्या प्रत्येक आंदोलनात सहभाग नोंदवला त्यांच्या हॉस्पिटलमध्ये जाऊन तब्येतीची विचारपूस करणे, बीडला आल्यावर सत्काराचे आयोजन करणे एक प्रकारे जरांगे पाटलावर आनंद काळे यांचे नितांत प्रेम करणारा हा माणूस आहे कुठलाही जातीभेद न करता सर्व समाजाचे आपण देणे लागतो या भावनेने त्यांनी उद्याच्या बैठकी ला जाणाऱ्या मराठा बांधवाची गैरसोय होऊ नये म्हणून खिचडी पाणी वाटप करण्याचे आयोजित केले आनंद भैय्या काळे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे तरी मराठा समाज बांधवांनी नाश्ता करूनच पुढे जावे असे आवाहन केले आहे

# निर्गुण निराकाराशी नात जोडणारी भा.शि.प्र.ही विवेकशील संस्था- बाळराजे दादा पवार



गेवराई ।प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित श्री चिंतेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालय,गेवराई येथे आज भा. शि.प्र.संस्था वर्धापन दिन व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा संपन्न झाला. या प्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष तथा श्री चिंतेश्वर संस्थानचे मठाधिपती श्री. मसाननाथ महाराज,प्रमुख उपस्थिती म्हणून मा.श्री.बाळराजे दादा पवार, मा.सौ.गीताभाभी बाळराजे पवार,भा.शि.प्र.संस्था कार्यवाह मा.श्री.हेमंतजी वैद्य स्थानिक उपाध्यक्ष श्री.राधेश्यामजी झंवर, कार्यवाह श्री.दत्ताजी पत्की,शालेय शिक्षण समिती अध्यक्ष श्री.अक्षयजी कुलकर्णी,शिशुवाटिका प्रमुख श्रीमती धनश्री ताई पत्की यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.शालेय विद्यार्थ्यांसाठी शालेय वाहन व शुद्ध पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थेचे उद्घाटन प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेणारे मा.कार्यवाहांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या ध्येय पथ... या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शालांत प्रमाणपत्र परीक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार व गुणगौरव प्रसंगी करण्यात आला.श्री दत्ताजी पत्की यांनी पंचप्रण या विषयी माहिती सांगत ते अंगीकृत करण्याची अपेक्षा व्यक्त केली.संस्थेच्या ७४ वर्षाचा इतिहासाचा मागोवा घेत पूर्व परिस्थितीतील काही प्रसंग मा.संस्था कार्यवाह श्री हेमंतजी वैद्य यांनी सांगत त्या प्रसंगातून शिक्षक व विद्यार्थांनी प्रेरणा घ्यावी असे प्रतिपादन केले व संस्था ७५ व्या वर्षात (अमृत महोत्सवी वर्षात) पदार्पण करत असल्याचे सांगितले,मा.श्री. बाळराजे दादा पवार यांनी अज्ञानाचा शोध घेणारी संस्था असे गौरवद्गार काढत भा.शि.प्र.संस्था निसर्गाशी नाती जोडणारी आहे असे सांगितले.

# गुटखा वाहतुक व साठ्यावर बीड पोलीसांच्या कारवाईचा बडगा !

## माजलगांव ग्रामीण व वडवणी पोलीसांच्या वेगवेगळ्या कारवायांमध्ये २५ लाखाचा गुटखा जप्त !!

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात मागील काळात अवैध गुटख्याची वाहतूक, साठा व विक्री करणाऱ्या इसमांविरुद्ध जोरदार कारवाया सुरु आहे. त्याचाच भाग म्हणुन दिनांक २७/०६/२०२५ रोजी माजलांव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. राहूल सुर्यतळ यांना गोपनीय माहीती मिळाली की, संजय शिवाजीराव होके (वय ३४, रा. पाटील गल्ली, माजलगाव) हा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा बेकायदेशीरपणे विक्री करत आहे. सदर माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांनी सपोनि प्रल्हाद मुंडे, पोअं/१६१९ अंगद घोडके यांचेसह माजलगाव शहरातील जुना मोंढा भागातील न्यू तुळजाभवानी ट्रेडर्स या किराणा दुकानावर छापा टाकला असता संजय शिवाजीराव होके (वय ३४. रा. पाटील गल्ली, माजलगाव) हा महाराष्ट्र शासनाने प्रतिबधित केलेला गुटखा बेकायदेशीरपणे विक्री करत असल्याचे आढळून आले. त्याच्याकडून विविध कंपनीचा एकूण ३७,४६२/- रुपये किमतीचा गुटखा व १५,०००/- रुपये किमतीचा सॅमसंग मोबाईल असा एकूण ५२,४६२/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच गुटखा आणून देणारा जुबेर सिद्दिकी (रा. माजलगाव) याचाही तपास करण्यात येत आहे. या दोघांविरुद्ध महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची बेकायदेशीर विक्री केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.त्यानंतर दुसऱ्या कारवाई आज दिनाक २८/०६/ २०२५ रोजी वडवणी पोलीस ठाण्याच्या सपोनि वर्षा व्हगाडे यांना गोपनीय माहीती मिळाली होती की, वडवणी पोलीस स्टेशन हद्दीतील कुंदेवाडी गावातील इसम नामे संतोष बाबासाहेब कोठुळे हा त्याचे राहते घरात रा. कुंदेवाडी ता. वडवणी येथे महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटख्याचा साठा करुन ठेवलेला आहे. त्यावरुन सपोनि वर्षा व्हगाडे यांनी पोअं/१८०९ विलास खरात, ९४९ बिभीषण मुंजाळ, १७४ नवनाथ लटपटे, १९७० किरण इरमले, २०१९ वसंत करे अशा पोलीस स्टाफसह खात्रीशीर गोपनीय माहितीच्या आधारे संतोष कोठुळे याचे राहते घरी कुंदेवाडी ता. वडवणी येथे छापा टाकला



असता त्याचेकडे याच्या राहत्या घरातून एकूण ३,७२,२००/- किंमतीचा विविध प्रकारचा गुटखा माल मिळून आला आहे. सदर प्रकरणात आरोपी संतोष बाबासाहेब कोठुळे रा. कुंदेवाडी ता. वडवणी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तसेच तिसऱ्या कारवाईत दिनांक २७/०६/२०२५ रोजी रात्री ११:५५ वा. माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. बालक कोळी यांना गोपनीय बातमीदारा मार्फत खात्रीलायक माहिती मिळाली की, आष्टी, जि. जालना येथून एक बोलेरो पिकअप वाहनातून अवैधरित्या गुटखा पो.स्टे. माजलगाव ग्रामीण हद्दीत येणार आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक यांनी पथक रवाना करुन पोलीस पथकाने मिडसांगवी पुलाजवळ दबा धरून थांबले असता एक बोलेरो पिकअप (क्र. चक४४ ण ०२६८) येताना दिसली. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा दिला असता, वाहनचालकाने तो आदेश न मानता भरधाव गाडी चालवत निघून गेला. पोलीसांनी तत्काळ पाठलाग केला असता टाकरवन तलावाजवळ वाहनचालकाने गाडी जागेवरच सोडून दिली व अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला.सदर पिकअपची दोन पंचा समक्ष झडती घेतली असता, १. जापराणी जर्दा, २. राजनिवास, ३. प्रीमियम शॉट ९९९, ४. डायरेक्टर स्पेशल पान मसाला असा सुगंधित व प्रतिबंधित तंबाखू मिश्रित गुटखा आढळून आला. सदर मुद्देमालाची अंदाजे किंमत ११,५३,६२५/- इतकी आहे, तर बोलेरो पिकअप वाहनाची किंमत ९,००,०००/- असून एकूण जप्त मुद्देमालाची एकत्रित किमत २०,५३,६२५/- आहे.या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन, बीड यांना कळवून पुढील कायदेशीर कारवाई प्रक्रियेत आहे. माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत गुटखा तस्करीस प्रतिबंध करण्यासाठी ही मोठी कारवाई करण्यात आली आहे.वरील तिन्ही कारवायांमधे एकुण २४,७८,२८७/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवायांमुळे बीड जिल्ह्यातील गुटखा विक्रेते, पुरवठादार, वाहतुकदार यांना मोठा झटका बसला आहे.

सदर कौतुकास्पद कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधीकारी श्री. निरज राजगुरु यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. बालक कोळी, पोलीस निरीक्षक श्री. राहुल सुर्यतळ, सपोनि वर्षा व्हगाडे यांनी त्यांचे अंमलदारांसह केली आहे.

# बालपणाचा आनंद घ्या, ताण न घेता अभ्यास करा,प्रामाणिकपणा हाच यशाचा खरा पाया आहे

## पोलीस पाल्यांसाठी मार्गदर्शन शिबीरात पोलिस अधीक्षक नवनीत काँवत व त्यांच्या पत्नी नितिका विलाश - काँवत यांनी केले मार्गदर्शन





बीड ।प्रतिनिधी

पोलीस मुख्यालयात २८ जून रोजी आयोजित एका विशेष कार्यक्रमात बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि त्यांच्या पत्नी नितिका विलाश-काँवत यांनी पोलीस पाल्यांना करिअर आणि जीवनाविषयी मौल्यवान मार्गदर्शन केले. या शिबिराला जिल्ह्यातील २०० हून अधिक पोलीस पाल्य आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात नितिका काँवत यांच्या भाषणाने झाली. त्यांनी करिअर निवडीच्या वेळी कोणता दृष्टिकोन ठेवावा, यावर मार्गदर्शन केले. कोणतेही करिअर क्षेत्र निवडताना त्यातून मिळणारे आत्मिक समाधान सर्वात महत्त्वाचे असते, असे त्यांनी सांगितले. काम करताना केवळ आर्थिक यश नव्हे, तर मनाला आनंद मिळणे आवश्यक आहे, असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार क्षेत्र निवडण्याचे आवाहन केले. त्यानंतर पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी विद्यार्थ्यांना अत्यंत महत्त्वाचा सल्ला दिला. ते म्हणाले, तुम्ही शालेय जीवनात असाल किंवा आयुष्यातील कोणत्याही टप्प्यावर, प्रामाणिकपणा हा तुमच्या यशाचा पाया आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय जीवनाचा पुरेपूर आनंद घेण्याचे महत्त्व पटवून दिले. बालपण आयुष्यात एकदाच येते आणि त्यानंतर जबाबदाऱ्या आयुष्यभर सोबतीला असतात, असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचा अनावश्यक ताण न घेण्याचा सल्ला दिला. बालपणाचा आनंद घेतानाच गुणवत्तापूर्ण शिक्षण घ्यावे, जेणेकरून आपले शैक्षणिक जीवन आणि बालपण दोन्ही वाया जाणार नाही, यावर त्यांनी भर दिला.मार्गदर्शन सत्रानंतर विद्यार्थ्यांनी करिअर, स्पर्धा परीक्षा आणि अभ्यासाच्या पद्धतींबद्दल अनेक प्रश्न विचारले. काँवत आणि त्यांच्या पत्नी नितिका काँवत यांनी त्यांच्या प्रत्येक प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देऊन त्यांच्या शंकांचे निरसन केले.

पोलीस मुख्यालयात सुसज्ज ग्रंथालय अन् अभ्यासिका उभारणार

या कार्यक्रमात पोलीस पाल्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय जाहीर करण्यात आला. पोलीस अधीक्षक काँवत यांनी सांगितले की, लवकरच पोलीस पाल्यांसाठी पोलीस मुख्यालयात एक सुसज्ज ग्रंथालय आणि अभ्यासिका उपलब्ध करून दिली जाईल. तसेच, विविध विषयांवरील तज्ञांचे मार्गदर्शन सत्र वेळोवेळी आयोजित करण्यात येईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. या निर्णयाचे उपस्थितांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले, कारण यामुळे पोलीस पाल्यांना त्यांच्या स्पर्धा परीक्षा आणि करिअरच्या तयारीसाठी मोठी मदत मिळणार आहे.



# फाईल पूर्ण झाली नाही, तर घरकुलाचा पैसाही नाही! - सीईओ मेघना कावली

मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील घरकुल योजनेंत 'काहीही चालतं' हे दिवस आता संपलेत! लाभार्थ्यांची फाईल पूर्ण झाल्याशिवाय त्यांच्या खात्यात एक रुपयाही टाकू नका, असा थेट आदेश जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी अधिकाऱ्यांना दिला.गुरुवारी पंचायत समितीमध्ये झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी घरकुल योजनेच्या संदर्भात अधिकार्यांची चांगलीच झाडाझडती घेतली. गावपातळीवर जाऊन लाभार्थ्यांच्या फाईली तयार करा, जिओ टॅगिंग प्रत्यक्ष जागेवर जाऊन करा, असे निर्देश देताना कामचुकार कर्मचाऱ्यांना खबरदारीचा इशाराही दिला.

कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरवश्यावर घरकुल योजना!


या महत्त्वाच्या योजनेत शासकीय कर्मचारीच नाहीत! संपूर्ण कारभार कंत्राटी ऑपरेटरकडे आहे. संगणक बंद, कार्यालयातील काम बंद, मोबाईलवरूनच घरकुल योजना 'पुन्हा पाहा' सुरू आहे. परिणामी सामान्य नागरिकांची फरपट होत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या स्थितीकडे गांभीर्याने लक्ष घालावे, अशी जनतेची मागणी आता जोर धरू लागली आहे. अधिकाऱ्यांची हजेरी या बैठकीस गटविकास अधिकारी चंद्रशेखर रामोड, सहायक गटविकास अधिकारी शिवाजी ढवळे, गटशिक्षणाधिकारी हमीद दौलताबादी, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक व सर्व विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी हजर होते. मात्र, कामाचा हलगर्जीपणा आणि जबाबदारी टाळण्याची वृत्ती काही ठिकाणी अजूनही कायम असल्याचं चित्र उघड झालं.

# बियाणे उगवले नाही अशा शेतकऱ्यांनी तात्काळ कृषी अधिकाऱ्याकडे तक्रारी कराव्यात - अशोक रोडे

मस्साजोग /प्रतिनिधी

खरिपाची पेरणी पाऊस बरा झाल्याने शेतकरी लगबगिने केली मात्र महाबीज सह अनेक कंपन्याचे सोयाबीन शेतामध्ये उगवले नाही, अशा शेतकऱ्यांनी तात्काळ संबंधित कृषी कार्यालयशी संपर्क साधून आपल्या तक्रारी कराव्यात अशा आव्हान शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती समिती सदस्य भाई अशोक रोडे यांनी केले आहे. केज तालुक्यातील शे. गांजी येथील पंधरा-वीस शेतकरी दि.२७ रोजी शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यालयात आले,त्यांनी बी उगवलं नसल्याची तक्रार कृषी कार्यालयाकडे दिली असल्याचे सांगितले,मात्र कृषी कार्यालयाचे अधिकारी आठ दिवस झाले त्यांच्याकडे कोणीही पंचनाम्याला गेले नाही अशी माहिती सदरील शेतकऱ्यांनी दिली यानंतर शेकापचे नेते भाई मोहन गुंड यांनी वरिष्ठ कृषी अधिकारीशी बोलून तात्काळ पंचनामे करून घ्या असं विनंती केली आहे. बीड धाराशिव (उस्मानाबाद), लातुर विभागाला बियाणेच परीक्षण करणारा अधिकारी एकच आहे त्यामुळे विलंब



होणार,पंचनाम्यासाठी परभणी विद्यापीठातून अधिकारी येणार नंतर त्याचे सॅम्पल घेऊन ते अहवाल देणार असल्यामुळे केज तालुक्यासह बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आधी संबंधित कृषी कार्यालयाकडे द्याव्यात.दुकानदाराकडून घेतलेले बियाण्याची पावती जपून ठेवावी जेणे करून कंपनी आणि दुकानदाराकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी सोपं जाईल शेतकरी कामगार पक्ष शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा आहे,मात्र शेतकऱ्यांनी तक्रारी देणे गरजेचे आहे.असे आव्हान शेकापचे भाई अशोक रोडे,भाई रचलिंग पाटील,भाई मंगेश देशमुख,अजिंक्य माने यांनी केले.

# सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड यांनी आंदोलनाचा इशारा देताच

## परळी-गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम झाले सुरु, रस्ता रोको आंदोलन स्थगित

परळी । परळी - गंगाखेड रस्त्याचे रखडलेले काम तातडीने सुरू करावे यासाठी रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दाउतपुरचे सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड यांनी देताच प्रशासन खडबडून जागे झाले आणि रखडलेले काम सुरू केले. मागणीला यश आल्याने सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड यांनी दि. ३० जुन रोजीचे रस्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित केले असुन नागरीकांच्या अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न सोडल्याबद्दल प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

परळी वैजनाथ ते गंगाखेड या राष्ट्रीय महामार्गाचे काम गेल्या काही दिवसांपासून बंद होते. यामुळे नागरिक, वाहनधारक, गावकऱ्यांची गैरसोय होत होती. तसेच रूग्णांची ने-आण करण्यासाठीही वाहन चालकाला तारेवरची कसरत करावी लागत होती. मागील वर्षी पुलाचे काम अर्धवट असल्याने सरस्वती नदीला आलेल्या पुरामुळे २ ते ३ वेळा २ दिवस शहराचा संपर्क तुटला होता. याबाबत वेळोवेळी सांगुनही रस्ता आणि पुलाचे काम केले जात नसल्याने दाउतपुरचे सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड यांनी सदरचे काम तात्काळ पुर्ण करण्यात यावे अन्यथा दि. ३० जुन २०२५ रोजी रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, विभाग लातूर, उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, उपविभाग परळी वैजनाथ यांना दिला होता. याबाबत तहसिलदार व्यंकटेश मुंडे, संबंधित विभागाचे अधिकारी व दाउतपुरचे सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड आणि सहकारी यांच्यात चर्चा झाली. सदरील रस्त्याचे तातडीने सुरू करण्यात आले असून पुलाचे कामही लवकरच पूर्ण करण्याचे आश्वासन संबंधितांनी दिले. ईटके कॉर्नर येथीलही कामास प्रत्यक्षात सुरू करण्यात आले आहे.

शक्तीकुंज वसाहत गेटजवळ शाळेसाठी विद्यार्थी मोठय़ा संख्येने ये - जा करीत असतात येथे गतीरोधक नसल्याने अपघाताची शक्यता असल्याने तिथे गतिरोधक बसण्याची मागणी सरपंच श्रीकांत फड यांनी केली होती. याबाबतही तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले. या भागातील जनतेच्या अतिशय जिव्हाळ्याच्या सर्वच प्रश्नावर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेऊन अर्धवट काम तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आणि काही कामास प्रत्यक्षात सुरुवात केली. त्यामुळे दाऊदपूरचे सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड यांनी उद्या सोमवार दिनांक ३० जून रोजी करण्यात येणारे रस्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याचे सांगितले. दरम्यान केलेल्या मागण्यांची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात केल्याबद्दल श्रीकांत फड यांनी संबंधित विभाग आणि प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत.



# जगाला हिरव्या मशालींची खरी गरज - सिने अभिनेते सयाजी शिंदे

## श्री क्षेत्र रामगडावर १० एकर मध्ये फुलणार सह्याद्री देवराई, सयाजी शिंदे यांच्या हस्ते ७५ झाडे लावून वृक्ष लागवडीला सुरुवात

बीड ।प्रतिनिधी

जगाला आपल्याकडून काही देता आलं तर ते वृक्ष लागवडीतून देता येईल. सध्या जगाला हिरव्या मशालींची गरज आहे. त्यामुळे प्रत्येकानी आपल्या आई-वडिलांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या वाढदिवसा येवढे झाडे लावली पाहिजेत. असे आवाहन सिने अभिनेते सयाजी शिंदे यांनी केले. बीड तालुक्यातील श्री क्षेत्र रामगड येथे १० एकर मध्ये फुलणाऱ्या सह्याद्री देवराई प्रकल्पाची सुरूवात त्यांच्या हस्ते ७५ झाडे लावून करण्यात आली. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते.

बीड शहरातील हॉटेल ऑलिव्ह येथे शनिवार दिनांक २८ जून २०२५ रोजी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये सिने अभिनेते सयाजी शिंदे बोलत होते. यावेळी लेखक अरविंद जगताप, सह्याद्री देवराई समन्वयक शिवराम घोडके यांची उपस्थिती होती. बीड शहरापासून पाच किलो मीटर अंतरावर असलेल्या पालवनच्या डोंगरावर २०१६-१७ मध्ये सिने अभिनेते सयाजी शिंदे, अरविंद जगताप, शिवराम घोडके यांनी वन विभागाच्या २५० एकरमध्ये १ लाख ६४ हजार विविध जातीचे वृक्ष लावून ३ एकर मध्ये ३ घन वन तयार केलेले आहे. त्याच धर्तीवर बीड पासून ७ किलो मीटर अंतरावर असलेल्या रामगडावर १० एकर मध्ये देवराई २ होणार आहे. येथे विविध सुगंधी, पक्षी बसणारे, औषधी, फळ, सावली देणारे १० हजार वृक्ष लावण्यात येणार आहेत. तर ४० गुंठ्यामध्ये २ घन वन प्रकल्पाचे काम १५ मे पासून सुरू झाले आहे. आतापर्यंत येथे ५ हजार खड्डे जेसीबीच्या सहायाने खोदण्यात आले आहे. या प्रकल्पाची माहिती देण्यासाठी अभिनेते सयाजी शिंदे यांनी पत्रकार परिषद घेवून माध्यमांशी संवाद साधला. श्री क्षेत्र रामगड येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी साळवे, डॉ. प्रदीप शेळके, सुहास वायंगणकर, सागर साठे,माजी सरपंच कोंडीराम निकम, शरद निकम हे उपस्थिती होते.

लेखक अरविंद जगताप यांच्या वडिलांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त ७५ झाडांची लागवड

श्री क्षेत्र रामगड येथे होणाऱ्या देवराई प्रकल्पाची सुरूवात लेखक अरविंद जगताप यांच्या वडिलांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त येथे वेगवेगळ्या जातीचे ७५ झाडे लावून सिने अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते सुरूवात करण्यात आली. प्रत्येकानी आपल्या आई-वडिलांच्या वाढदिवसानिमित्त असा उपक्रम राबवावा असे आवाहन सयाजी शिंदे यांनी यावेळी केले.



### रामगड देवराई मध्ये प्रत्येक पत्रकारांनी वृक्ष लागवड करावी - वैभव स्वामी

बीड जिल्ह्यात येऊन वृक्ष संवर्धनाचा अनमोल संदेश प्रसिद्ध सिने अभिनेते सयाजीराव शिंदे आणि दिग्दर्शक अरविंद जगताप देत आहेत हे आपले बीड जिल्ह्याचे भाग्य आहे. त्यांनी पालवन येथे सह्याद्री देवराईचे नंदनवन केले. आता कुमशी शिवारातील रामगड येथे दुसरी देवराई उभी करत आहेत. मी यापुढे माझ्या आई वडिलांचा वाढदिवस या रामगड मध्ये झाड लावून साजरा करणार आहे. बीड जिल्ह्यातील प्रत्येक पत्रकाराने आपल्या आई-वडिलांवरील प्रेम किंवा स्वतःचा वाढदिवस या दुसऱ्या देवराई मध्ये वृक्ष लागवड करून साजरा करावा असे बीड जिल्ह्यातील पत्रकारांना विनंती वजा खुले आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी केले आहे.

### अगोदर डोक्यात झाड लावा, नंतर जमिनित लावा - शिवराम घोडके

वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकानी अगोदर डोक्यात झाड लावलं पाहिजे. जोपर्यंत आपल्या डोक्यात झाड लावून जगवण्याची संकल्पना उतरणार नाही. तोपर्यंत जमिनीत झाडे लागणार नाहीत. त्यामुळे अगोदर आपल्या डोक्यात झाडे लावा. वृक्ष लागवड ही सह्याद्री देवराई, वनविभाग, रामगड आणि भक्तांच्या सहकार्यातून होत आहे. सह्याद्री देवराईचे काम पूर्ण झाल्यानंतर आलेल्या प्रत्येक भाविकाला प्रसाद म्हणून रामगडावर झाड दिले जाणार आहे. भाविकांनी ते झाड आपल्या शेतात लावावे.

-शिवराम घोडके, जिल्हा समन्वयक, सह्याद्री देवराई



### एका झाडामध्ये १५ फुटाचे अंतर तर २० फुटाचा असणार रस्ता

१० एकर मध्ये झाडे लावताना त्याचा अभियंत्यामार्फत पूर्ण प्लॅन तयार करून घेण्यात आला आहे. येथे विविध कार्यक्रमाला आलेल्या नागरिकांना सहज झाडाच्या सावलीला बसता येईल झाडाखाली वाहन पार्क करता येईल. वाहन पार्किंगच्या ठिकाणी दोन्ही झाडांच्या मध्ये २५ फुटांचे अंतर ठेवण्यात येणार आहे. प्रत्येक झाडामध्ये १५ फुटाचे अंतर असणार असून मध्ये २० फुटाचे रस्ते बनवण्यात येणार आहेत. त्यामुळे देवराई २ भविष्यात बीड जिल्ह्याचे नाव उज्वल केल्याशिवाय राहणार नाही हे निश्चित.

### सिता वन, राम वन, पंचवटी होणार...

येथे विविध जातीचे वृक्ष लागवड केली जाणार आहे. त्यामध्ये वेगवेगळे वृक्ष असणार आहेत. गडाजवळ कमी उंचीचे त्यापुढे मोठ-मोठे असे वृक्ष लागवड होणार आहे. विशेष म्हणजे येथे सिता वन, राम वन अणि पंचवटी वन तयार करण्यात येणार आहे.

### महाराष्ट्रातल्या प्रत्येक मंदिरातून वृक्ष प्रसाद योजना राबवावी..

प्रत्येकाची आपआपल्या देवावर नितांत श्रद्धा आणि भक्ती असते. मंदिरात जाऊन जो भक्त दर्शन घेईल, अभिषेक करेल त्याला मंदिराच्या वतीने प्रसाद म्हणून एक वृक्ष भेट द्यावा.ते वृक्ष त्यांनी मंदिर परिसरात अथवा जिथे जागा आहे, झाड जगेल वाढेल अशा ठिकाणी लावून ते झाड जोपासावे.अशी योजना आम्ही वृक्ष प्रसाद म्हणून राबवणार आहोत. हीच योजना सरकारने राज्यातल्या प्रसिद्ध आणि सर्वच मंदिरातून राबवण्यासाठी शासन आदेश पारित करावेत, असे खुले आव्हान प्रसिद्ध सिने अभिनेते सयाजीराव शिंदे यांनी केले आहे.

### तुम्ही फक्त झाडे लावण्याचे सकारात्मक पाऊल उचला - दिग्दर्शक अरविंद जगताप


कोण काय करतं याकडे लक्ष देण्यापेक्षा प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून जगवलं पाहिजे. याचा विचार करणे आवश्यक आहे. जर झाडे तोडली जाणार असतील तर लावून उपयोग काय ? हा बुरसटलेला विचार आधी बाजूला ठेवा.आणि सकारात्मक दृष्टिकोनातून फक्त झाड आपण लावायच आणि ते जगवायच एवढाच विचार मनात ठेवा. निश्चितच तुमचा परिसर नंदनवन होईल. त्या ठिकाणी ती झाडे तुम्हाला फळे, फुले, सुगंध आणि शुद्ध हवा देऊन वातावरण प्रफुलित करेल असे खुले आवाहन प्रसिद्ध दिग्दर्शक अरविंद जगताप यांनी केले.

# दहशत माजवणाऱ्या इसमाकडून तलवार व कुऱ्हाड जप्त

बीड ।प्रतिनिधी

दि. २८/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन पिपळनेर, ता. जि. बीड हद्दीतील मौजे अंधरवण पिंपरी येथे एक इसम बेकायदेशीररीत्या गोठाण जमिनीची नांगरणी करत असून त्याच्याकडे घातक हत्यारे असल्याची माहिती सरपंच पती भाऊराव दुर्गादास प्रभाळे यांनी पोलीस ठाण्यात दिली. सदर माहिती मिळताच पोलीस अंमलदार दिलीप नारायण सोनवणे यांनी ही माहिती मा. सपोनि श्री. घुगे यांना कळवून पो.उप.नि. गोलवाल व पो.शि. ढाकणे याच्यासह पटनास्थळी धाव घेतली.

घटनास्थळी पोहोचल्यानंतर, आरोपी श्याम दशरथ वाघमारे (वय ३५ वर्षे, रा. अंचरवण पिंपरी) हा गावातील गोठाण जमिनीची नांगरणी करताना आढळून आला. त्याच्या हातात एक लोखंडी स्टीलच्या पात्याची तलवार होती. गावकऱ्यांनी विचारणा केली असता त्याने त्यांना तलवार व कुल्हाडीने धमकावले होते. पोलीसांनी तत्काळ कारवाई करत त्याला ताब्यात घेतले आणि तलवार तसेच त्याच्या सांगण्यावरून बाजूला झाडाखाली ठेवलेली लोखंडी कुऱ्हाड जप्त करण्यात आली.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधीक्षक बाळकृष्ण हानपुडे-पाटील, सपोनि



मधुसुदन घुगे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अर्जुन गोलवाल, पोलीस अंमलदार दिलीप सोनवणे, ढाकणे यांनी केली आहे.

जप्त केलेला मुद्देमाल

एक स्टीलच्या पात्याची लोखंडी तलवार किंमत अंदाजे ५००/-, एक अर्धचंद्राकार धारदार लोखंडी कुऱ्हाड किंमत अंदाजे ५००/- एकूण किंमतः १०००/- वरील दोन्ही हत्यारे पंचासमक्ष जप्त करण्यात आले असून आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

# पुन्हा चौसाळा बायपासला चोरट्यांचा हैदोस

## शेतकऱ्याचे २२ लाखाचे डाळिंब गेले चोरीला

चौसाळा ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनूर पोलीस स्टेशनच्या हद्दीमधील चौसाळा परिसरामध्ये होणाऱ्या चोरीच्या घटनेमुळे चौसाळा परिसरामधील नागरीकामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग मोकळा चोरटयाना मोकळा सोडल्याचे चित्र पहावयास मिळत आहे धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग लगत असलेल्या शेतीमधील चौसाळा येथील शेतकरी सयाजी शिंदे यांच्या शेतातील सात एकरातील अंदाजे २२ ते २३ टन डाळिंब गुरुवारी रात्री अज्ञात चोरट्यांनी चोरी केली आहे याबाबतीत सयाजी शिंदे यांनी चौसाळा पोलीस चौकीला तक्रार दाखल केली असून सयाजी शिंदे यांचे अंदाजे २२ ते २३ लाख रुपयांचे नुकसान झाले असल्यामुळे पुन्हा चोरट्यांनी शेतकऱ्यांना टार्गेट केल्याचे चित्र पहावयास



मिळत आहे चौसाळा परिसरामध्ये चोरीच्या घटना वाढताना दिसत आहे धुळे सोलापुर महामार्ग हा चोरट्याचा बालेकिल्ला झाल्याचे पाहायला मिळत आहे गेल्या महीनाभरापुर्वीच धाराशिव येथील मोरे नामक व्यक्ती ला याच बायपासवरती लुटले होते तर चौसाळा येथील सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांना देखील लुटण्याचा प्रयत्न झाला होता तसेच चौसाळा घारगाव रस्तया नजीक असलेल्या पांडुरंग कळासे यांच्या दहा शेळयाची चोरी झाली होती हे सर्व गून्हे प्रलंबित असतानाच शेतकऱ्याचे २३ लाख रुपयाचे सात एकरमधील डाळिंब चोरीला गेल्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे पोलीस प्रशासन चोरट्यांचा शोध लावणार का? असा प्रश्न चौसाळा येथील नागरिक विचारताना दिसत आहेत

# शिक्षणाधिकारी भगवान फुलारी बीईओ लक्ष्मण बेडसकरवर मेहरबान का ?

धारूर ।प्रतिनिधी

प्राथमिक शिक्षणाधिकारी भागवान फुल्लारी यांचे काळे कारनामे पुन्हा चर्चेत येवू लागले आहेत. फुलारी आणि केजचे बीईओ लक्ष्मण बेडसकर या दोघांची मिलीभगत आहे. त्यामुळे फुलारी सातत्याने बेडसकरवर मेहरबान होत आहेत. नियुक्ती न देण्याची तक्रार फुल्लारी यांनी बेकायदेशीरपणे निकाली काढली आहे. त्यामुळे भ्रष्टाचार निर्मूलनचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि सादेक इनामदार यांनी पुन्हा सीईओंकडे लेखी तक्रार केली आहे. या तक्रारीवर आता सीईओ जितीन रहमान नेमकी कोणती कारवाई करतात याकडे लक्ष लागले आहे.

केज येथील प्रभारी गटशिक्षणाधिकारी बेडसकर यांच्यावर लाचेचा गुन्हा आहे. तरीही त्यांना तेथीलच पदभार देण्यात आला. हा पदभार काढून इतरत्र बदली करावी, अशी मागणी करण्यात आली होती. परंतू तक्रारच बेकायदेशीरपणे निकाली काढून पाठराखण करण्याचे काम बीडचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी हे करीत आहेत. अशी तक्रार भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष शेख सादिक इनामदार यांनी सीईओ जितीन रहमान यांच्याकडे केली आहे. केजचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर लाच घेताना मागील काळामध्ये गुन्हा दाखल झाला होता. तर ३१ डिसेंबर २०२४ रोजी मुख्याध्यापकामार्फत विडा शिक्षकाकडून लाच मागीतली होती. त्या प्रकरणात सुध्दा प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांचा रोल होता परंतू शासनाच्या नियमाला डावलून पदाचा गैरवापर करून तत्कालीन मुख्य कार्यकार्यांची दिशाभूल करून परत परत ज्या ठिकाणी लाच घेतली होती त्या ठिकाणी प्रभारी गटशिक्षण अधिकार्याचा पदभार बेडसकर यांना देण्यात आला. या विरोधात सादेक इनामदार यांनी तक्रार केली होती. त्या तक्रारी अर्जावर तत्कालीन मुख्य कार्यकारी

### नियुक्ती न देण्याची तक्रार बेकायदेशीरपणे निकाली काढल्या प्रकरणी सादेक इनामदार यांची शिक्षणाधिकार्यांविरोधात

अधिकारी आदित्य जीवने यांनी रिमार्क करून तात्काळ अहवाल सादर करा, असे आदेश दिले. परंतू त्यांची बदली होताच व नवीन सीईओ जितीन रहमान यावर कारवाई करतील या भीतीपोटी शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी तो अर्ज बेकायदेशीररित्या निकाली काढला आहे. आपण तो अर्ज परत मागवून घेवून चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी सादेक इनामदार यांनी सीईओ जितीन रहमान यांच्याकडे केली आहे. त्यानुसार आता यामध्ये नवे सीईओ नेमकी कोणती कारवाई करतात संपूर्ण शिक्षण विभागाचे लक्ष असणार आहे.

# वैद्यराज प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, अंबड येथे छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात संपन्न

अंबड ।प्रतिनिधी

वैद्यराज प्राथमिक व माध्यमिक विद्यालय अंबड येथे छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम प्राथमिकच्या मुख्याध्यापिका दुर्गा घुगे यांच्या व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकांत जायभाये यांच्या हस्तेछत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



विद्यार्थ्यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्यावर, शिक्षणप्रेमावर व समतेच्या विचारांवर आधारित भाषणे दिली. त्यांनी शाहू महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना, त्यांच्या सुधारणा कार्याचा मागोवा घेत प्रेरणादायी विचार सादर केले. काही विद्यार्थ्यांनी कविता व घोषवाक्यांच्या माध्यमातून देखील आपले विचार व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी देखील शाहू महाराजांच्या कार्यावर आपले विचार मांडले व विद्यार्थ्यांना त्यांच्या आदर्शांनुसार चालण्याचे आवाहन केले.या जयंती उत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये समतेचा, सामाजिक न्यायाचा व शिक्षणाचे महत्त्व जाणण्याचा नवा दृष्टिकोन निर्माण झाला. याकार्यक्रमास मुख्याध्यापिका घुगे मॅडम, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक जायभाय सर, शिक्षक दत्ता राक्षे सर, संतोष बोंडे सर, किशोर पिवळ सर भगवान संसारे सर, परमेश्वर वखरे सर, कांतीलाल राठोड सर, रागिणी आतकरे मॅडम,कैलास आधोडे सर, उषा नागरे मॅडम, वाघमारे सर इत्यादी मान्यवर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# पनवेल महानगरपालिकेची प्रगतीशील पनवेल भव्य -दिव्य लघूपट स्पर्धा

## ३.७५ लाख रूपयांची रोख पारितोषिके

पनवेल ।प्रतिनिधी

पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या संकल्पनेतून 'प्रगतीशील पनवेल' ही भव्य दिव्य अशी लघूपट स्पर्धा ( शॉर्ट फिल्म) महानगरपालिके मार्फत आयोजित करण्यात आली आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली विकसनशील विकासात्मक प्रगतीशील अशी पनवेल महानगरपालिकेची वाटचाल सुरू आहे. येत्या १ ऑक्टोबरपासुन पनवेल महानगरपालिका आपल्या दशकपूर्ती वर्षात पदार्पण करीत आहे. मनपाचा गत नऊ वर्षांच्या कालावधीत विविध विकास कामे केली आहेत. त्याच संदर्भात ही लघूपट स्पर्धा जाहिर करण्यात आली आहे.

अटी शर्ती

ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. लघुपटाचा कालावधी दहा ते पंधरा मिनिटे एवढाच असेल. मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेतील लघुपट पात्र असतील. मात्र 'प्रगतीशील पनवेल' हा विषय केंद्रभागी असणे महत्त्वाचे आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी hिर्हीषळश्रालिसारळश्र.लो या ईमेल आयडी वरती नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी नंतर संबंधितांना स्पर्धेच्या सविस्तर अटी शर्ती बाबत माहिती दिली जाईल.

पारितोषिके

स्पर्धेसाठी एकुण २० पारितोषिके देण्यात येणार असून त्यांची रोख रक्कम तीन लाख ७५ हजार एवढी आहे. यात सर्वोकृष्ट लघूपटास १ लाख रूपये रोख, प्रशस्तीपत्रक सन्मान चिन्ह असे पारितोषिक असणार आहे. तर द्वितीय लघूपटास ७५ हजार रूपये रोख, प्रशस्तीपत्रक सन्मान चिन्ह, तृतीय लघूपटास ५० हजार रूपये रोख, प्रशस्तीपत्रक सन्मान चिन्ह व उत्तेजनार्थ २ लघूपटास प्रत्येकी २५ हजार अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. या शिवाय ५ लघूपटांना प्रत्येकी १० हजार तर १० लघूपटांना प्रत्येकी स्पर्धेसाठी ५ हजार विशेष पारितोषिके देण्यात येणार आहेत. याशिवाय दशकपूर्तीनिमित्त दहा पारितोषिके असणार आहेत.लघूपट स्पर्धेसाठी १५ जुलै पूर्वी नोंदणी करणे आवश्यक आहे. त्याकरिता hिर्हीषळश्रालिसारळश्र.लो या ईमेल आयडी वर तसेच मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर ९८९२१०८३६५ या क्रमांकावर दुपारी दोन ते चार या वेळेतच संपर्क साधावा.या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात येत आहे.



# शेतकऱ्याने फुलवली डाळिंबाची बाग, चोरट्यांनी अख्खे डाळिंब केले साफ

### एसपी साहेब, २२ लाख रुपयांचे डाळिंब चोरीला जाऊन देखील पोलीस साधी तक्रार सुद्धा घेईनात!

चौसाळा ।प्रतिनिधी

येथील शेतकरी सय्याजी शिंदे यांची चौसाळा बायपास लगत सात एकर शेती आहे. सदरील शेतीमध्ये डाळिंबाच्या बागाची लागवड केलेली आहे. या सात एकर शेती मधील अंदाजे २२ ते २३ टन डाळिंब अज्ञात चोरटयाने चोरुन घेवून गेले असल्याने अंदाजे किंमत २२ लाख रुपये रुपयांचे नुकसान शेतकऱ्याचे झाले आहे.

याबाबतीत चौसाळा पोलीस चोकीला तक्रारदार सयाजी शिंदे हे दोन दिवसापासून तक्रार देण्यासाठी जात असतानाही त्यांची तक्रार नोदवून घेतली जात नाही.अगोदर आम्हाला चौकशी करू दया मगच आम्ही तक्रार नोंदवून घेऊत असे चौसाळा पोलीस प्रशासनाचे म्हणने असुन दोन दिवस झाले घटना घडुन तरी तक्रार नोंदवून घेतली जात नाही. हे शेतकऱ्यांसाठी किती त्रासदायक आहे.याची एसपी साहेब, आपण गांभीर्याने दखल घेऊन संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांवर पोलिसांवर कठोर कारवाई करून शेतकऱ्यांना न्याय दिला पाहिजे.

# बीडमध्ये इंडस्ट्रीज झोन वाढला पाहिजे - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

## बीड जिल्हा उद्योजक असोसिएशनच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये विविध उद्योग व्यवसाय वाढण्यासाठी इंडस्ट्रीज झोन वाढले पाहिजेत.यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड जिल्ह्यातील उद्योजक आणि उद्योजक असोसिएशन यांची व्यापक बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी बीड जिल्ह्यातील इंडस्ट्रीज वाढली पाहिजे यासाठी सकारात्मक भूमिका घेतल्याने उद्योजक असोसिएशनच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयात २५ जून रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतःहून पुढाकार घेत बीड जिल्ह्यामध्ये इंडस्ट्रीज झोन वाढला पाहिजे याकरिता उद्योजक व उद्योजक असोसिएशन यांची व्यापक बैठक घेतली. या बैठकीमध्ये त्यांनी उद्योजक आणि उद्योजक असोसिएशन यांची मते जाणून घेतली. यावेळी बीड जिल्हा उद्योजक संघटनेचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा यांनी बीड जिल्ह्यामध्ये ॲग्रो इंडस्ट्रीज, स्पिनिंग अँड वेविंग मिल्स, तसेच केमिकल झोन इंडस्ट्री वाढली तर बीड जिल्ह्यातील शेती उद्योगांना चालना मिळेल आणि सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळेल. बीड जिल्ह्याच्या भौगोलिक वातावरणानुसार या इंडस्ट्रीज झोन वाढल्या तर इतर जिल्ह्यातील राज्यातील मोठमोठे इंडस्ट्रीज येथे येथील आणि बीड जिल्ह्याचा विकास होईल अशी भूमिका मांडली. त्यावर जिल्हाधिकारी यांनी सकारात्मक निर्णय आगामी काळात यासंदर्भात घेतला जाईल असे आश्वासन दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी घेतलेल्या या सकारात्मक भूमिकेबद्दल उद्योजक आणि उद्योजक असोसिएशनच्या वतीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे बीड जिल्हा उद्योजक संघटनेचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा तसेच जिनिंग अँड प्रेसिंग असोसिएशनचे सचिव सीए गोपाल कासट, कृष्णा उपरे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.



### पोहरादेवी येथे २९ जूनला बंजारा समाजाच्या जातनिहाय जनगणनेबाबत विशेष चर्चासत्रासाठी

# समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - शरदभाऊ राठोड

परळी ।प्रतिनिधी

हिंदुस्थानातील बंजारा समाजाच्या भविष्य घडविणाऱ्या ऐतिहासिक निर्णयासाठी २९ जून २०२५ रोजी पोहरादेवी (जि. वाशिम) येथे विशेष चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. अखिल भारतीय बंजारा (लमाणी) शक्तीपीठ व धर्मगुरू बापूसिंग महाराज यांच्या नेतृत्वाखाली जातनिहाय जनगणनेच्या मुद्द्यावर व्यापक विचारमंथन होणार आहे.या विशेष सत्रात समाजातील धर्मगुरू, महंत, महिला नेत्री, युवा नेते, शिक्षक, पत्रकार, विद्यार्थी आणि विविध घटकांचे प्रतिनिधी



सहभागी होणार असून, समाजहितासाठी एकत्र येण्याचे हे सुवर्णसंधीचे व्यासपीठ असणार आहे.अखिल भारतीय बंजारा क्रांती दलाचे राष्ट्रीय महासचिव शरदभाऊ राठोड यांनी समाजबांधवांना आवाहन करताना सांगितले की, ही जनगणना केवळ आकडयांची नोंद नसून, समाजाच्या अस्तित्व व अधिकारांचा लढा आहे. त्यामुळे प्रत्येक घटकाने या परिषदेस उपस्थित राहून आपली भूमिका स्पष्ट करावी.या चर्चासत्रात खालील प्रमुख धर्मगुरू आणि महंत सहभागी होणार असून सदर चर्चासत्रात भाग घेणाऱ्यांनी जातनिहाय जनगणनेशी संबंधित कोणतेही लेखी/मौखिक माहितीपत्र, पुरावे, दस्तऐवज असल्यास ते सोबत आणावेत असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# धर्माबाद तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण १ जुलै २०२५ रोजी काढण्यात येणार

## आरक्षण सोडतील सर्व पक्षीय तसेच नागरिकांनी उस्फूर्तपणे उपस्थित राहावे - तहसीलदार सौ.सुरेखा स्वामी

धर्माबाद / अशोक पडोळे

धर्माबाद तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाचे वर्ष २०२५ ते २०३० साठी आरक्षण सोडत १ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वा. तहसिल कार्यालय धर्माबाद येथे काढण्यात येणार आहे. सरपंच पदाचे आरक्षणात धर्माबाद तालुक्यात एकुण राखीव ४५ पदांपैकी २४ महिलांसाठी राखीव पदे आहेत. सर्व संबंधीतानी तसेच माजी जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य. तालुक्यातील नागरिक व महिला यांनी या सोडतीस उपस्थित रहावे, असे आवाहन तहसिलदार सुरेखा स्वामी धर्माबाद यांनी केलेआहे.

जिल्हाधिकारी नांदेड यांची अधिसूचना २३ जून २०२५ नुसार धर्माबाद तालुक्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकाचा मागास प्रवर्ग आणि स्त्रिया यांच्यासाठी राखून ठेवावयाची सरपंचाची पदे मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ च्या नियम



२ अ चे पोटनियम ३ व ४ अन्वये जिल्हाधिकारी नांदेड यांनी पुढील तपशिलानुसार अधिसूचीत करुन दिले आहे.सरपंच पदाचे आरक्षण अनुसूचित जातीसाठी एकुण राखीव पद ९ त्यापैकी ५० टक्के महिलांसाठी राखीव ५, अनुसूचित जमाती ७ पैकी महिलासाठी ४, नागरिकांचा मागास प्रवर्ग एकुण राखीव पद १२ पैकी महिलांसाठी ६, खुला प्रवर्ग एकुण राखीव पद १७ पैकी ५० टक्के महिलांसाठी ९ राखीव ठेवण्यात आली आहेत.आरक्षण हे सन २०२५ ते २०३० मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी अमलात राहील. सदर प्रवर्गाच्या सरपंच पदासाठी सोडत पद्धतीने तहसिल कार्यालय धर्माबाद येथे मंगळवार १ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वा. करण्यात येईल. सर्व संबंधीतानी असेही आवाहन



# सावरकर महाविद्यालयात राष्ट्रीय वाचन दिन साजरा

बीड ।प्रतिनिधी

ग्रंथालय चळवळीचे जनक पी. एन. पन्नीकर यांच्या पुण्यतिथी निमित्त राष्ट्रीय वाचन दिनाच्या औचित्याने १९ जून रोजी स्वा. सावरकर महाविद्यालयामध्ये ग्रंथालय विभागाच्यावतीने साजरा करण्यात आला.पी. एन. पन्नीकर यांच्या ग्रंथालय शास्त्रातील योगदानाचे महत्त्व व त्यांच्या कार्याचा गौरव आणि सन्मान देण्यासाठी राष्ट्रीय वाचन दिन साजरा केला जातो असे ग्रंथपाल प्रो. अनुजा कास्त्तीकर यांनी विशद केले. प्राचार्य प्रोफेसर सुहास मोराळे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन संपन्न झाले. कार्यक्रमा प्रसंगी उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हानकर, ग्रंथालय समिती सदस्य, सर्व सहकारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर, श्री बाळासाहेब वाघमारे व श्री सचिन चौरे यांनी प्रयत्न केले.



# बीड जिल्ह्यातील शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडवणार – सीईओ जितीन रहमान

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदला नव्यानेच रुजू झालेले जितीन रहमान साहेब मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांचा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. जिल्हाध्यक्ष भगवान पवार यांनी बीड जिल्हयातील शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न पदोन्नती , वरिष्ठ व निवड श्रेणी , जूनी पेन्सन , इ . डल धारकांची विषय निश्चिती,वेळवर पगार , वैदयकिय परिपूर्ती हे इतर महत्वाचे प्रश्न यावेळी साहेबा समोर मांडले. सत्कारास उत्तर देताना साहेबांनी शिक्षकांचे सर्व प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा बीडची स्वतंत्र बैठक घेवून प्रश्न मार्गी लावण्याचे अभिवचन दिले.यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष भगवान पवार , राज्यकार्य कारणी सदस्य नामदेव शिंदे,शिक्षक संघाचे पदाधिकारी बप्पासाहेब देवगुडे , जिवन बागलाने, बिभिषण हावळे,परमेश्वर बिडवे, बंडू घोरड,निलेश चव्हाण, संजय वागुले, संचालक गोविंद वायकर, अमोल काळे, सूनिल शिंदे यांच्यासह मोठ्या संखेने पदाधिकारी उपस्थित होते.

# केज तालुक्यातील सर्वात सुंदर सरकारी शाळेचा बहुमान पटकावला जि.प.मा.शा.भाटुंबा शाळेने

केज/प्रतिनिधी

पंचायत समिती केज येथील सभागृहात पार पडलेल्या मोठ्या दिमाखदार सोहळ्यात केजच्या गटविकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाने यांच्या हस्ते जि.प.माध्यमिक शाळा भाटुंबा शाळेतील सर्व शिक्षक आणि मुख्याध्यापक यांना तीन लाख रुपयांचा प्रतिकात्मक धनादेश, विजयी चषक, प्रमाणपत्र,पुस्तक आणि शाल,श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य शासना मार्फत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेमध्ये सन २०२४- २५ चे शासकीय व्यवस्थापनाच्या शाळा आणि खाजगी व्यवस्थापनाच्या शाळा अशा दोन गटातून सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या प्रथम तीन शाळांची निवड केली जाते.या निवडलेल्या शाळा पुढे जिल्हा स्तरावर तालुक्याचे प्रतिनिधित्व करत असतात.भरपूर किचकट निकष असणारी ही स्पर्धा प्रत्येक शाळेचा कस पाहते.शाळेचे बाह्यरूप, परिसर,मैदान, वृक्षारोपण,शाळेत किती उपक्रम राबवले जातात? उपक्रमांचा दर्जा कसा असतो? विद्यार्थ्यांचा सहभाग किती असतो? सर्व उपक्रमांचे रेकॉर्ड केव्हा पासून मेंटेन केलेले




आहे? असे अनेक निकष पार करत केज तालुक्यातून प्रथम क्रमांक जिप माध्यमिक शाळा भाटुंबा (तीन लाख रुपये),द्वितीय क्रमांक जि प उच्च प्राथमिक शाळा,तांबवा (दोन लाख रुपये), तृतीय क्रमांक जि प प्राथमीक शाळा शिंदी (एक लाख रुपये) या शाळांनी बहुमान पटकावलेला आहे.बक्षीस वितरण करत असताना गटविकास अधिकाऱ्यांनी भाटुंबा या गावाचे आणिशाळेचे विशेष नामोल्लेख करत कौतुक केले हे विशेष. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केजचे गटशिक्षणाधिकारी श्री. लक्ष्मणराव बेडस्कर तर प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण विस्ताराधिकारी श्री.सुनील केंद्रे आणि श्री.दत्ता चाटे उपस्थित होते.मनोगत व्यक्त करताना जिप माध्यमिक शाळाभाटुंबा शाळेचे मुख्याध्यापक श्री.डॉ.कंचनवार सर यांनी सर्वांनाच मागील काही वर्षातील एका पत्र्याच्या खोलीपासून ते वर्तमान शाळायातील बदल अनुभवण्यासाठी सर्वांना भाटुंब्यास येण्याचे आमंत्रण दिले. होळ केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.संजय चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली भाटुंब्याची शाळा उल्लेखनीय कामगिरी करत आहे.केज तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख आणि विजेत्या शाळेतील सर्व शिक्षक वृंद, मुख्याध्यापक यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या याकार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सुवर्णा सिरसट आणि कार्यक्रमाचा समारोप श्री.आश्रुबा सोनवणे यांनी छान प्रकारे केला.

# स्व. सुवालालजी वाकेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त मान्यवरांकडून अभिवादन

## स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न, गुणवंतांचा गौरव, शालेय साहित्य, रेनकोटचे वाटप

स्व. सुवालालजी वाकेकर यांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय कार्याचा मान्यवरांकडून उजाळा

परळी (प्रतिनिधी)

परळीच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात मोलाचे योगदान देणारे, समाजभूषण स्व. सुवालालजी वाकेकर यांच्या २१ व्या स्मृतिदिनानिमित्त स्व. सुवालालजी वाकेकर प्रतिष्ठान व मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने पंचक्रोशीतील विविध स्पर्धा परीक्षेमध्ये यशवंत ठरलेल्या गुणवंतांचा गौरव व संत धुराबाई आदर्श प्राथमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व रेनकोटचे वाटप करण्यात आले. हाच उपक्रम तालुक्यातील विविध शाळांमध्ये राबविण्यात येणार असल्याचे स्व. सुवालालजी वाकेकर प्रतिष्ठान व मराठवाडा साहित्य परिषद परळी शाखेचे अध्यक्ष विजयकुमार वाकेकर यांनी सांगितले. दरम्यान सकाळी गंगाखेड रोडवरील स्व. सुवालालजी वाकेकर यांच्या समाधी स्थळी मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले.

स्व. सुवालालजी वाकेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त शुक्रवार दिनांक २७ जून रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विविध क्षेत्रांमध्ये नावलौकिक मिळवलेल्या गुणवंतांचा सत्कार, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व रेनकोटचे वितरण आणि संत धुराबाई विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्नेहभोजन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ९.१५ वाजता गंगाखेड रोडवरील स्व. सुवालालजी वाकेकर यांच्या समाधी स्थळावर विविध मान्यवर व कुटुंबीयांच्या उपस्थितीत अभिवादन सभा संपन्न झाली. यावेळी वाकेकर परिवारातील सर्व सदस्य, विविध पक्षांचे नेते, कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी व मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

गुणवंतांचा सत्कार, शालेय साहित्य, रेनकोटचे वाटप

समाजभूषण स्व. सुवालालजी वाकेकर यांच्या २१ व्या स्मृतिदिनानिमित्त स्व. सुवालालजी वाकेकर प्रतिष्ठान व मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने विविध स्पर्धा परीक्षेमध्ये यशवंत ठरलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व संत धुराबाई आदर्श प्राथमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व रेनकोटचे वाटप करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजयकुमार वाकेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ नेते बाळासाहेब देशमुख, परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुर्यभान नाना मुंडे, युवक नेते निळकंठ चाटे, प्रा. पवन मुंडे, उद्योजक विशाल जैन, उद्योजक श्रीयांश पगारिया, अनिल तांदळे, निर्मळे आप्पा, किशोर केंद्रे, गोविंद महाराज मुंडे, वसंत राठोड, राजेंद्र लोढा, रामेश्वर कोकाटे महाराज, डॉ. प्रकाश वाकेकर, पारस वाकेकर, ज्ञानोबा सुरवसे, संजय खाकरे, शीतल पोकर्णा, सावन कुचेरिया, दीपक वाकेकर, अंश जैन, वंश जैन, डॉ. आगम वाकेकर, आर्यन वाकेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी स्व. सुवालालजी वाकेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. परळी जन्मभूमीत समाजिक व शैक्षणिक कार्य करण्यात सुवालालजी वाकेकर यांचा खूप मोठा वाटा होता असे प्रतिपादन बाळासाहेब देशमुख यांनी केले तर नेहमीच वाकेकर कुटुंब नेहमागरीब मुलांना मदतीचा हात देत असत. त्याचबरोबर साहित्यिक सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान या कुटुंबाने दिले आहे असा भाव उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

विजयकुमार वाकेकर यांचा सत्कार

यावेळी मराठवाडा साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते विजयकुमार वाकेकर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मराठवाडा साहित्य परिषदेच्या नवनिर्वाचित पदाधिकारी प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड (सचिव), प्राचार्य अरुण पवार (उपाध्यक्ष), अनंत मुंडे (कार्याध्यक्ष), प्रा.संजय आघाव (कोषाध्यक्ष), दिवाकर जोशी (सहसचिव), सिद्धेश्वर इंगोले ( प्रसिद्धी प्रमुख ), बालाजी कांबळे (संपर्कप्रमुख) यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठवाडा साहित्य परिषदेचे प्रा. डॉ. राजकुमार यल्लावाड, कवी अरुण पवार, कवी संजय आघाव, दिवाकर जोशी, सिद्धेश्वर इंगोले यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कवी अनंत मुंडे तर सूत्रसंचालन बालाजी कांबळे यांनी केले.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिकशाळा तरनळी शाळेत डॉ.हेलन केलर जयंती साजरी

केज/प्रतिनिधी

दि.२७ जुन २०२५ शुक्रवार रोजी डॉ.हेलन केलर जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम व श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम यांनी पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले व जयंती साजरी करून दिव्यांग दिन साजरा केला.याप्रसंगी तरनळी येथील ज्येष्ठ दिव्यांग नागरिक राधाबाई रामकिशन खामकर यांना या शाळेतील शिक्षिका श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला तसेच दिव्यांग शिक्षक श्री.बाबासाहेब राजाराम मैंद सर यांना श्री बाळासाहेब भिल्लु राठोड सर यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.डॉ.हेलन केलरचा जन्म दि.२७जुन १८८० रोजी झाला.एकोणीस



महिन्यांच्या असतांना आजारपणामुळे त्यांनी दृष्टी व श्रवणशक्ती गमावली.दिव्यांगासाठी,महिलांचा मताधिकार, कामगार हक्क, जागतिक शांततेसाठी त्यांनी मोहिम चालविली जगप्रसिध्द वक्ता व लेखक झाल्या.त्यांनी विपुल लेखन केले.असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिकशाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले. श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम व श्री.बाळासाहेबभिल्लु राठोड सर यांनी सखोल माहिती दिली.श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम,श्री. बाबासाहेब राजाराम मैंद सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम यांनी आभार मानले.

# भगवानगड पालखीचे तागडगाव येथे भव्य रिंगण सोहळा, अश्व मिरवणूक व भक्तांची मोठी गर्दी

मानूर (प्रतिनिधी)

श्री क्षेत्र संस्थान भगवानगडची पंढरपूरकडे निघालेली पालखी तागडगाव येथे पोहोचली. परंपरेप्रमाणे तागडगाव येथे पालखीचे भव्य स्वागत करण्यात आले. गावातील प्रत्येक रस्ता, गल्ली, घरे सजवली होती. घराघरासमोर तोरणं, रांगोळ्या, फुलांची आरास आणि पवित्र वातावरणामुळे संपूर्ण गाव भक्तिमय झाला होते.पालखी आगमनानंतर पारंपरिक रिंगण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. ढोल-ताशांचा निनाद, टाळ-मृदंगांचा गजर भगवान बाबा की जय आसा वारकऱ्यांचा जल्लोष यामुळे तागडगावचा परिसर थरारून गेला. सालखे अश्व रिंगणात उतरले आणि त्यांनी आपल्या कौशल्यपूर्ण चाली, वेगवान फेऱ्या, उंच उड्या आणि उधळणारे वळण यांमुळे उपस्थितांच्या हृदयात थरार निर्माण केला.



रिंगण म्हणजे पालखी सोहळ्याचा एक महत्त्वाचा अध्यात्मिक आणि सांस्कृतिक भाग. येथे अश्व रिंगण करतो, आणि त्यानंतर पालखी व वारकरी मंडळी त्याच्या मागून धाव घेतात. हा सोहळा भक्ती, उत्साह, आणि श्रद्धेचा परमोच्च बिंदू असतो. रिंगणात भाग घेणारे वारकरी शिस्तबद्ध आणि भक्तिभावाने भरलेले होते.या सोहळ्यास सुमारे पाच हजार वारकरी व परिसरातील हजारो भाविक उपस्थित होते. तागडगाव परिसरातील लोक मोठ्या संख्येने आले होते.यावेळी महंत न्यायाचार्य नामदेव शास्त्री महाराज यांचा ग्रामस्थांतर्फे सत्कार करण्यात आला. पालखीतील भजनी मंडळांनी कीर्तन व अभंग गायन करून वातावरण अधिक भक्तिमय केले.

वारकऱ्यांसाठी भोजन, निवारा आणि पाण्याची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. सर्व गावकऱ्यांनी मिळून संयोजन केले होते.तागडगाव हे संत भगवानबाबा यांच्या मावशीचे गाव असून, त्यांच्या मावशीने बाबांना २५ एकर जमीन दान दिलेली आहे. त्यामुळे या गावाशी भगवानगड संस्थानचे एक विशेष आध्यात्मिक नाते आहे. संत भगवानबाबा यांनी अनेक वेळा येथे मुक्काम करून कीर्तन-भजन केले होते. आजही ही परंपरा न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव शास्त्री महाराज जतन करून पुढे नेत आहेत.

# प्रदिप हनुमंत नारायणकर यांच्या पिएचएन कंपनीकडून सर्व विद्यार्थांना विषयाप्रमाणे वह्यांचे वाटप

पाटोदा (प्रतिनिधी)

जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा पाटोदा येथे शनिवार दि २८ / ०६ / २०२५ रोजी प्रदिप हनुमंत नारायणकर यांच्या पिएचएन कंपनीकडून सर्व विद्यार्थांना विषयाप्रमाणे वह्या, दुरेघी वही, चाररेघी वही, बॉक्सची वही,एक कंपास, ड्राइंग ची वही, कलर बॉक्स, लाल पेन, निळा पेन इत्यादी साहित्य उपयुक्त शैक्षणिक साहित्य वाटप केले गेले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पाटोदा नगरीचे प्रथम नागरिक नगराध्यक्षा सौ. दिपाली राजूभैया जाधव या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून पाटोदा पोलिस स्टेशनचे पि आय सोमनाथ सर व पठाण सर तसेच श्री नारायणकर काका, श्री पंकज श्री. नितीन श्री. खान साहेब, श्री.इम्रान भैया पालक प्रतिनिधी श्री. दिलीप जावळे, दिव्यांग प्रतिनिधी श्री. संतोष गाडेकर शालेयस




व्यावस्थापन समितीचे सरफराजनवाज ( गुड्डु भैया), फैय्याज सय्यद, शेख अजिम, शेख तबरेज, मतीनखाँ पठाण, शेख तैसीफ, सय्यद खदिर, संतोष सोनवणे तसेच बहुसंख्य महिला माता पालक,जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा पाटोदाचे मुख्याध्यापक श्री बांगर जयराम सर, श्रीम. लता राऊत श्रीम. बालीका वाघमारे श्रीम.माया गर्जे श्रीम. काकडे साधना श्रीम. ज्योती पवार कु. घोलप ताई श्रीम. राधा हजारे श्रीम. हिराबाई राऊत ,बालू राऊत व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन, प्रस्ताविक व आभार कु. सुरेखा खेडकर यांनी मानले.यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना आले.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेता झक्छ ने पाठवलेले सर्व शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना मिळाले. विद्यार्थी शिक्षक व पालक सर्वांना खूप आनंद वाटला .सर्व विद्यार्थी पालक व सर्व शिक्षकांकडून झक्छ चे खूप खूप आभार व्यक्त




मानूर (प्रतिनिधी)

शिरूर तालुक्यातील दहिवंडी येथील महात्मा फुले विद्यालयात शनिवारी गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ आणि पालक मेळावा संपन्न झाला.या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणुन संस्थापिका प्रा. सुशीला मोराळे यांची तर प्रमुख पाहुणे म्हणून सिद्धेश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री,सरपंच कालिदास आघाव,उपसरपंच रवि आघाव,नगरसेवक अन्वर शेख,ग्रामपंचायत सदस्य अशोक कठाळे,संदीप आघाव,अमजद सय्यद,मोईन शेख,रहमान शेख,परमेश्वर भाबड यांची उपस्थिती होती.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले विद्यालयाच्या दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक बी.आर.जायभाये यांनी सूत्रसंचालन रमेश बडे तर आभारप्रदर्शन बळीराम तोगे यांनी केले.शेवटी एक पेड माँ के नाम या उपक्रमाअंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.


# सोमवारपासून राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन

मुंबई : प्रतिनिधी

पहिलीपासून हिंदीची सक्ती करण्याच्या निर्णयावरून राजकारण तापलेले असताना सोमवारपासून राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू होत असून हिंदी शक्तीबरोबरच शक्तिपीठ महामार्ग, शहरी नक्षलवाद रोखण्यासाठी आणलेले जनसुरक्षा विधेयक आदी विषयांवर सरकारची कोंडी करण्याची मोर्चेबांधणी विरोधकांनी केली आहे. प्रथेप्रमाणे अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्र्यांनी चहापानाचे आयोजन केले असून, प्रथेप्रमाणे विरोधक बहिष्कार घालणार अशी शक्यता आहे.

हिंदी सक्तीच्या विरोधात उद्धव व राज ठाकरे ५ जुलै रोजी एकत्र येऊन मोर्चा काढणार असून राष्ट्रवादी काँग्रेससह अन्य पक्षही सहभागी होणार आहेत. यावरून राज्याचे राजकारण तापलेले असताना, सोमवारी राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू होत आहे. विरोधी पक्षाच्या आमदारांची संख्या कमी असली तरी महायुती सरकारची कोंडी करण्यासाठी विरोधाकांकडे यावेळी अनेक मुद्दे आहेत. पहिलीपासून हिंदीची सक्ती, शेतक-यांचा विरोध डावलून शक्तिपीठ महामार्गाचे काम सुरू करणे, शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावर सरकारने केलेले घुमजाव, अंदाज समितीच्या धुळे दौ-यात सापडलेले कोट्यवधी रुपयांचे घबाड, पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण असे अनेक मुद्दे विरोधकांच्या हातात आहेत. याचे पडसाद या अधिवेशनात उमटू शकतात.

महायुतीने विधानसभा निवडणुकीत शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. राज्यात एप्रिल- मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेतक-यांचे मोठे नुकसान केले. गारपीट आणि अवकाळीने शेती पिकाचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे शेतक-यांना कर्जमाफी देण्याची मागणी विरोधी पक्षाकडून होत आहे.



### उद्धव-राज मनोमिलनामुळे ठाकरे गटात उत्साह

५ जुलैच्या मोर्चाच्या निमित्ताने तब्बल १९ वर्षांनंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येत आहेत. मुंबई महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने ही मोठी घडामोड आहे. यामुळे विधानसभेतील पराभवानंतर खचलेल्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे मनोधैर्य वाढले आहे. त्यामुळे अधिवेशनात विरोधक आक्रमक होण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आधार घेत महायुती सरकारने राज्य शिक्षण मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळेत इयत्ता पहिलीपासून तृतीय भाषा म्हणून हिंदीचा समावेश केला आहे. याची तीव्र प्रतिक्रिया उमटल्यानंतर अनिवार्य हा शब्द वगळून हिंदी ऐच्छिक असेल अशी सारवासारव करण्यात आळ. आता ही केवळ मौखिक भाषा म्हणून शिवली जाणार असे सांगितले जात आहे. पण पहिलीपासून हिंदी नकोच अशी ठाम भूमिका मनसे व उद्धव ठाकरे गटाने घेतली आहे. सरकार मात्र अजूनही त्रिभाषा सूत्र लागू करण्याच्या निर्णयावर ठाम आहे. यामुळे या विधिमंडळात सत्ताधारी आणि विरोधी पक्षात जोरदार खडाजंगी होण्याची शक्यता आहे.

### या मुद्यांवर अधिवेशन गाजणार?

- पुण्यातील हुंडाबळी ठरलेली वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण
- मे, जून महिन्यातील पावसाचा मुंबई, पुण्यातील जनजीवनाला बसलेला फटका
- पुण्यात तळेगाव जवळच्या इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून पर्यटकांचा झालेला मृत्यू
- इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा सुरू असलेला गोंधळ

### शक्तिपीठही गाजणार

गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीत कोल्हापूर जिल्ह्यातील शेतक-यांचा रोष नको म्हणून वर्ध्यातील पवनार ते सिंधुदुर्गातील पत्रादेवी पर्यंतच्या ८०२ किलोमीटर लांबीच्या शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला स्थगिती देण्यात आली होती. मात्र निवडणुकीनंतर सत्तेत येताच या महामार्गाला पुन्हा चालना दिली आहे. शक्तिपीठ महामार्ग कोल्हापूर जिल्ह्यातून नेण्यास या जिल्ह्यातील मंत्र्यांचाच विरोध आहे. तरीही हा विरोध डावलून महामार्गाचे काम रेटण्याचा सरकारचा निर्धार आहे. त्यामुळे अधिवेशनात या महामार्गाच्या उपयुक्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून विरोधी पक्षासह सत्ताधारी पक्षाचे आमदार सरकारची कोंडी करू शकतात.

मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी कर्जमाफीचा निर्णय योग्यवेळी होईल असे सांगून तूर्त कर्जमाफीचा निर्णय घेण्यास असमर्थता व्यक्त केली आहे. तरीही विरोधी पक्षाकडून अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीचा मुद्दा लावून धरला जाऊ शकतो.

शिवसेना शिंदे गटाचे आमदार अर्जुन खोतकर अध्यक्ष असलेल्या विधिमंडळाच्या अंदाज समितीचा पहिलाच धुळे दौरा वादग्रस्त ठरला. समितीच्या या दौ-यात शासकीय विश्रामगृहावर कोट्यवधी रुपयांची रोकड आढळून आली. या प्रकरणाची पोलिस चौकशी सुरू असली तरी यानिमित्ताने विधिमंडळ समित्यांच्या कामकाजाकडे संशयाने पाहिले जाऊ लागले आहे.